**महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण,२०१२**
**याची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : युकधो-२०११/प्र.क्र.४३/क्रीयुसे-३,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : १४ जून,२०१२.**

प्रस्तावना :- देशाचे युवा धोरण सन २००३ मध्ये जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील १३ ते ३५ वयोगटातील युवा लोकसंख्येचा विचार करता, देशाच्या युवा धोरणाच्या अनुषंगाने राज्याचे स्वतंत्र युवा धोरण तयार झाल्यास त्याद्वारे युवक कल्याणाच्या विविध योजना राबविणे शक्य आहे. या पार्श्वभूमीवर एकंदरीतच राज्याच्या युवक कल्याण क्षेत्राचा आढावा घेऊन स्वतंत्र युवा धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.२.२०१० च्या शासन निर्णयान्वये एका समितीची नियुक्ती करण्यात आली होती. समितीने युवक कल्याण क्षेत्राशी निगडीत विविध घटक (युवा कार्यकर्ते, युवक संघटना, संस्था, शैक्षणिक संस्था इत्यादी) यांच्याशी विचारविनिमय करुन धोरणाचा प्रारुप मसुदा शासनास सादर केला होता. त्यानुसार राज्याचे सर्वंकष स्वतंत्र युवा धोरण घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

: शा स न नि र्ण य : या शासन निर्णयाद्वारे राज्याचे युवा धोरण,२०१२ घोषित करण्यात येत असून, त्याची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये पुढील बाबी समाविष्ट राहतील :-

(१) सदर धोरणामध्ये युवक कल्याण कार्यक्रम, युवा वसतीगृह निर्मिती, युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना याशिवाय युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी संबंधित सर्व घटकांना प्रोत्साहन देण्याची महत्त्वाची भूमिका आहे.

(२) सदर धोरणात समाविष्ट बाबींचा सविस्तर तपशील सोबतच्या परिशिष्ट-"अ" मध्ये नमूद केला आहे.

(३) सदर धोरणाच्या अनुषंगाने हाती घ्यावयाच्या नवीन प्रस्तावित योजनांचा तपशील परिशिष्ट- "ब" मध्ये देण्यात आला आहे.

(४) या धोरणाच्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक घटकासाठी अग्रक्रमानुसार स्वतंत्रपणे अंमलबजावणी प्रक्रिया (लागू असेल त्यानुसार वित्तीय आकृतीबंधासह) स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे निर्देशित करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल,

(५) या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार प्रशासकीय सूचना स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात येतील,

(६) शासनाच्या सध्या सुरु असलेल्या जे युवक कल्याण विषयक कार्यक्रम/ उपक्रम/ योजनांत सुधारणा किंवा बदल करणे आवश्यक वाटत नाही त्यांचा समावेश या धोरणात स्वतंत्रपणे केलेला नाही. सदर कार्यक्रम/उपक्रम/योजना पूर्ववत सुरु राहतील,

(६) सदर धोरण पथदर्शक असून त्यात यथायोग्य बदल वेळोवेळी शासन मान्यतेने करण्यात येतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक-२०१२०६१४१०३१३२०५०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सतीश जोंधळे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
(२) मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
(३) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
(४) संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
(५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(७) नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
(८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(९) उप सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
(१०) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
(११) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
(१२) मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(१३) मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(१४) अवर सचिव (क्रीयुसे-१ / क्रीयुसे-२), (१५) निवड नस्ती (क्रीयुसे-३).

F:\e drive\VAIJU\SPORTS 3\YUVA DHORAN G.R.

परिशिष्ट अ

# राज्य युवा धोरण-२०१२

# महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण

## अनुक्रमणिका


| अ क्र | बाब | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | ३ |
| १.१ | युवा धोरण प्राधान्य बाबी | ४ ते ५ |
| १.२ | युवा धोरणाची आवश्यकता, युवांची व्याख्या | ५ ते ६ |
| १.३ | धोरण आखताना विचारात घेतलेले युवा गट | ६ |
| १.४ | युवांचे हक्क | ७ |
| १.५ | युवांची कर्तव्ये | ७ |
| १.६ | मार्गदर्शक तत्वे | ७ |
| १.७ | युवांना सक्षम करण्यासाठी महत्वपूर्ण घटक | ८ |
| १.८ | शिक्षण व उच्चशिक्षण | ८ ते १० |
| १.९ | प्रशिक्षण व कौशल्य विकास | १० ते १३ |
| १.१० | रोजगार व स्वंयरोजगार | १३ ते १५ |
| १.११ | आरोग्य व जीवनपध्दती | १५ ते १७ |
| १.१२ | पर्यावरण संरक्षण | १७ ते १८ |
| १.१३ | क्रीडा व मनोरंजन | १८ ते २० |
| १.१४ | कला व संस्कृती | २० ते २३ |
| १.१५ | विज्ञान व तंत्रज्ञान | २४ ते २५ |
| १.१६ | नागरिकत्व | २५ ते २६ |
| १.१७ | सामाजिक सुरक्षा | २६ ते २७ |
| १.१८ | पौगांडावस्था / किशोरावस्था | २७ ते २८ |
| १.१९ | युवा सामाजिक प्रतिष्ठा निर्देशांक (सोशल क्रेडिट) | २८ ते २९ |
| १.२० | युवा वसतिगृह स्थापना व युवा पुरस्कार | २९ ते ३० |
| १.२१ | अमंलबजावणी यंत्रणा व नियमन | ३० ते ३१ |
| १.२२ | युवा धोरणाचा कालावधी व आढावा | ३१ |
| २.१ | राज्य युवा धोरण ठरविण्यासाठी गठित केलेली समिती | ३१ ते ३४ |
| २.२ | महाराष्ट्र राज्याचे युवा धोरणः प्रस्तावित योजना (परिशिष्ट ब) | ३५ ते ४१ |

# प्रास्ताविक

लोकशाही समाज व्यवस्थेत समाजातील सर्व घटकांना विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे असते. याच भूमिकेतून राज्यशासनाने यापूर्वी महिला धोरण, क्रीडा धोरण, सांस्कृतिक धोरण इ.विविध धोरणे जाहीर केली असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे. युवावर्ग हा देखील आपल्या देशातील लोकसंख्येचा महत्वाचा घटक आहे. किंबहुना युवकांची मोठी लोकसंख्या हे आपल्या देशाचे मोठे श्रम भांडवल आहे. याचा विचार करता युवावर्गाला विकास प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेणे आणि त्यांच्या सर्वांगिण विकासालाही चालना देणे या बाबी राष्ट्र उभारणीसाठी महत्वाच्या आहेत.

प्रत्येक राज्याचे स्वतंत्र युवा धोरण असावे असे भारत सरकारने 'राष्ट्रीय युवा धोरण' २००३ मध्ये सुचविले होते. त्यानुसार राज्याचे स्वतंत्र युवा धोरण ठरविण्यासाठी शासन निर्णय २० फेब्रुवारी, २०१० नुसार महाराष्ट्र शासनाने समिती स्थापन केली होती. या क्षेत्रातील तज्ज्ञ, युवा पुरस्कारार्थी, अभ्यासक, युवा विकासाचे कार्य करणारे संस्था, तसेच विधानमंडळ सदस्य यांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन, समितीने युवा धोरणाचा प्रारुप मसुदा शासनास सादर केला होता.

जागतिकीकरणाच्या युगात सक्षम युवा विकासासाठी व्यवस्थापन कौशल्य, बहुशाखीय कौशल्य, व्यक्तिमत्व विकास कौशल्य अनिवार्य ठरली आहेत. यासाठी शिक्षणाबरोबरच उपजिविका, रोजगार-स्वयंरोजगारासाठी तांत्रिक शिक्षणाची ओळख करुन प्रशिक्षण व कौशल्य क्षमता विकसित करणे इ. बाबींचा विचार युवा धोरणात करण्यात आलेला आहे.

भौगोलिक वैविध्य, राज्यातील सामाजिक परिस्थिती, स्थानिक स्तरावर उपलब्ध विकसित होऊ शकणा-या संधी तसेच शाश्वत विकास यावर धोरणामध्ये भर देण्यात आला आहे. युवा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा व राज्यस्तर युवा पुरस्कार, युवा वसतिगृहे, युवा आदान-प्रदान कार्यक्रम, सुविधा केंद्र उभारणी अशाप्रकारे अनेक हितावह योजना राज्यात राबविण्यासाठी युवा धोरण २०१२ तयार करण्यात आलेले आहे. या धोरणाच्या व त्याअनुषंगाने राबविलेल्या योजनांचा लाभ राज्यातील युवावर्गाला होईल असा विश्वास आहे.

## महाराष्ट्राचे युवा धोरण प्राधान्य बाबी


राज्यातील युवा धोरणामध्ये शिफारस केलेल्या बाबींचा विचार करता युवांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी परिणामकारक उपाय योजना करण्यासाठी खालील बाबी प्राधान्याने करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये | प्राधान्य बाबी |
|---|---|---|
| १ | युवा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना | • युवांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करणे आवश्यक आहे. राज्य प्रशिक्षण केंद्राच्या नियंत्रणाखाली प्रत्येक जिल्हयात युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करावयाची आहे. यामधून युवांना सक्षम करण्यासाठी उपक्रम कार्यान्वित होणार आहेत. |
| २. | युवा वस्तिगृहाची निर्मिती | • युवांना नोकरी, व्यवसाय, प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी शहरी भागात जावे लागते. महसूल विभागाच्या सहा ठिकाणी किमान १०० व्यक्तींसाठी वस्तिगृहाची सुविधा निर्माण करावयाची आहे. ही वस्तिगृहे माफक दरात कार्यान्वित करावयाची असून, जागेची उपलब्धता व किमान सोयी सुविधा या बाबी विचारात घेऊन आराखडा तयार करण्यात येईल.<br>• शहरातील शासकीय/ खाजगी मालकीच्या इमारती भाडेतत्वावर घेऊन युवा वसतिगृहे कार्यन्वित करण्यात येतील. |
| ३. | युवा पुरस्कार | • युवांनी केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव करुन त्यांना सन्मानित करण्यासाठी राज्य व जिल्हास्तरावर युवक, युवती तसेच संस्था यांना पुरस्कार देण्यात येईल. |
| ४. | युवक कल्याण कार्यक्रम | •युवांसाठी राष्ट्रीय एकात्मता शिबीर, राज्यांतर्गत व देशांतर्गत युवा आदान प्रदान कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तीमत्व विकास, व्यवसाय स्वयंरोजगार मार्गदर्शन इ. उपक्रमांचे आयोजन करणे.<br>•युवांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर युवा महोत्सव आयोजन.<br>•युवा दिन व युवा सप्ताह साजरा करणे. |
| ५. | युवा मित्रांची नियुक्ती | •युवांच्या हितावह योजनांचा प्रचार व प्रसार युवा संस्था, मंडळे यांच्याशी समन्वय, कार्यक्रम आयोजनामध्ये युवांचा सहभाग, प्रशासकीय कामकाजात युवांचा सहभाग वाढविण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर मानधनावर करार पध्दतीने युवा मित्रांची नियुक्ती करणे. |
| ६. | इतर उपक्रम | • युवांच्या निगडीत विविध विषयांची माहिती, रोजगार उपक्रम मार्गदर्शन इ. करिता संकेत स्थळ विकसित करणे. |

| अ.क्र. | धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये | प्राधान्य बाबी |
|---|---|---|
| | | • युवांना भविष्यातील उदर निर्वाहाच्या संधी प्राप्त करताना कौशल्य पारंगत करणे व स्पर्धात्मक जगताशी सुसंगत राहण्यासाठी कौशल्य विकास संस्था राज्यात स्थापन करणे.<br>• व्यवसाय शिक्षण कायद्याची अंमलबजावणी करणे.<br>• युवांच्या यशस्वी गाथा, समुपदेशन, मार्गदर्शन, प्रेरणा, देणारे उपक्रम, दूरचित्रवाहिनीवर प्रदर्शित करण्यासाठी नियोजन करणे.<br>• युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.<br>• महानगर व नगरपलिका परिक्षेत्रात नागरी सुविधा केंद्राच्या व्यवस्थापनात युवा विकासाचे कार्य करणा-या संस्थांना प्राधान्य देणे व त्याद्वारे प्रशिक्षित युवांचे तांत्रिक कौशल्याचा वापर करणे. |

मी एक युवक आहे ....
माझेही काही स्वप्न आहे.

- भारतरत्न राजीव गांधी
भारताचे सातवे पंतप्रधान (१९८४-१९८९)



## युवा धोरणाची आवश्यकता

भारत हा तरुणांचा देश समजला जातो. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या तरुणांची आहे. युवांना जागतिकीकरणाच्या गतिशी संतुलितपणे जोडण्यासाठी, आपल्या देशातील युवांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, भौगोलिक वैविध्यतेचे ज्ञान, उत्पन्नाची साधने, नागरिकांची कर्तव्ये व जबाबदा-या याकडे विशेष लक्ष देणे अत्यावश्यक आहे. श्रमशक्तीचे योग्य व्यवस्थापन केल्यास राज्याच्या विकास प्रक्रियेत युवांचा मोठा असणारा सहभाग वृध्दिंगत होऊ शकतो. मागील साठ वर्षांच्या कालखंडात युवकांसाठी विविध योजना राबविण्यात आल्या असल्या तरी त्यामध्ये सुसूत्रता व दर्जा वाढ करणे गरजेचे आहे. लोकसंख्येने मोठया असलेल्या घटकाच्या विविध गरजांकडे लक्ष न पुरविल्यास त्यांच्यामध्ये प्रचलित व्यवस्थेविषयी वैफल्य येऊन त्यांच्यातील क्रयशक्तीचा विधायक वापर होऊ शकणार नाही. राज्य सातत्याने अग्रेसर राहण्याच्या यावरील दूरदृष्टीकोनातून युवांशी निगडीत प्रश्न, समस्या उपाययोजनाचा साकल्याने विचार करुन, युवांना सक्षम करण्यासाठी युवा धोरणाची आवश्यकता आहे.

## युवांची व्याख्या

युवा धोरणातील विविध शिफारशी व प्रस्तावित योजना यांच्याकरिता युवांची सर्वसाधारण व्याख्या करणे आवश्यक ठरते. राज्याच्या युवा धोरणात **१३ ते ३५ वर्षे वयोगटातील सर्व व्यक्ती म्हणजे युवा** अशी युवांची व्याख्या समजण्यात यावी. यामध्ये १३ ते १९ वर्ष ही किशोरावस्था/पौगंडावस्था (Adolescents) म्हणून अधोरेखित केली आहे. ही व्याख्या राष्ट्रीय युवा धोरणाशी समकक्ष आहे. किंबहुना राष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने राबविण्यात येणा-या देशपातळीवरील योजनांचा लाभ राज्यातील युवांना होण्यासाठी ही समकक्षता ठेवली आहे.

## धोरण आखताना विचारात घेतलेले युवा गट

समाजातील लिंग, धर्म, जाती-जमाती, भाषा, लोकवस्ती व उत्पन्न गट यामध्ये विभागलेल्या सर्वच स्तरातील युवा घटकांच्या समस्यांपर्यन्त पोहोचण्याचा प्रयत्न या धोरणात करण्यात आला आहे. यामध्ये दूर्गम भागातील आदिवासी/बिगर आदिवासी युवांबरोबरच विकसीत प्रदेशातील किमान सुविधा उपलब्ध असणारे युवादेखील विचारात घेतले आहेत. या देशातील सामाजिक वास्तवाची जाण ठेवून अल्पसंख्यांक, मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय दुर्लक्षित युवा यांचा साकल्याने विचार केला आहे. राज्यातील वाढते नागरीकरण पाहता नागरी भागातील गलिच्छ वस्त्यांमधील युवांबरोबरच उच्चशिक्षित युवांचे प्रश्नही सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. आतापर्यंतच्या सर्व प्रकारच्या धोरणात दुर्लक्षित राहिलेल्या परंतु या राज्यातील रोजगाराचे अद्यापही प्रमुख स्त्रोत असणा-या कृषि क्षेत्रातील युवांचाही हे धोरण आखतांना विचार करण्यात आला आहे.

## युवांचे हक्क

युवांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेताना त्यांचे सर्वसाधारणतः खालीलप्रमाणे हक्क निश्चित करणे उचित ठरते.

- भारतीय राज्यघटनेने मान्य केलेले मुलभूत हक्क.
- समाजिक विकासाच्या योजना व प्रकल्पांच्या अंमलबजावणीसोबत निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क.
- वैयक्तिक आवड व क्षमतेच्या पार्श्वभूमीवर शिक्षण प्राविण्य प्राप्त करण्याचा हक्क
- रोजगार उपलब्धता व रोजगार निर्मितीचा हक्क, व्यवसाय निवडण्याचा हक्क.
- विद्यार्थी आणि विद्यार्थेतर युवांच्या संघटना करणे, नियंत्रण करणे व त्यांचे व्यवस्थापन करण्याचा हक्क.
- आरोग्याच्या किमान सुविधा, स्वच्छ पर्यावरण व निवारा मिळविण्याचा हक्क.
- हिंसा,विषमता,फसवणूक व पिळवणूक यांच्यापासून सामाजिक न्याय सुरक्षिततेचा हक्क.
- क्रीडा, कला, मनोरंजन, सांस्कृतिक व साहसी उपक्रमाच्या संधी मिळविण्याचा हक्क.

## युवांची कर्तव्ये

हक्क व कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे युवांना विविध हक्क देताना त्यांचेकडून सर्वसाधारणतः खालीलप्रमाणे कर्तव्ये पार पाडली जाणे अपेक्षित आहे.

- भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्याचे पालन करणे.
- शांतता, सुरक्षितता व सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून वर्तन असणे.
- सर्व प्रकारच्या हिंसा, शोषण, गुन्हेगारी, भेदभाव यापासून मुक्त समाजाच्या उभारणीत योगदान देणे.
- सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहणे.
- संस्कृती, भाषा, धर्म, प्रांत यातील वैविध्य तसेच समाजातील सर्व घटकातील व्यक्तींचे मुलभूत अधिकार व स्वातंत्र्याचा आदर करुन राष्ट्रीय एकात्मता अखंड ठेवणे.
- राष्ट्रसेवा व सामाजिक कार्यात स्वयंप्रेरणेने देश व राज्याच्या विकासासाठी योगदान देणे.
- सार्वजनिक मालमत्ता आणि इतरांच्या मालमत्तेचा सन्मान करणे.
- पर्यावरण समतोल व या देशातील निसर्गसंपदेबाबत संवेदनशील राहून संरक्षण आणि जतन करणे.
- जागतिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाच या देशातील समृध्द परंपरा व ज्ञानसंपदेचा आदर ठेवणे.

## मार्गदर्शक तत्वे

युवा धोरण म्हणजे तरुणांच्या आशा आकांक्षांचे आणि स्वप्नपूर्तीचे साधन ठरावे, त्यातून त्यांच्या उन्नतीची व अपेक्षांची दिशा निश्चित व्हावी असे अभिप्रेत आहे. जीवनामध्ये निश्चित लक्ष्य गाठण्यासाठी काही तत्वे अंगीकारणे आवश्यक असते. या धर्तीवर खालील सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे धोरण आखताना निश्चित करण्यात आली आहेत.

- **लिंगसमभाव** : युवक व युवती असा भेद न करता सर्व क्षेत्रांमध्ये समान दर्जा व संधी.
- **युवा सहभाग** : युवांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्व प्रकारच्या उपक्रमात सक्रिय सहभाग.
- **सर्वसमावेशकता** : सर्व युवांना समान संधी,सर्वांना सन्मानाने जगण्याचा अधिकार, शैक्षणिक, शारीरिक, सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक दृष्ट्या वंचित समूहांच्या किमान विकासावर विशेष भर ठेवणारा मराठी बाण्याचा जागतिक युवक
- **विविधतेचा स्विकार** : सांस्कृतिक, भाषिक, प्रांतिक आणि धार्मिक विविधतेचा स्वीकार व आदर.
- **शाश्वत विकास** : विद्यमान पिढीच्या गरजांची पूर्तता करताना भावी पिढीसाठी नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करुन निसर्गाशी सामंजस्यपूर्ण सहअस्तित्व.
- **जबाबदारी** युवांची समाजाप्रती आणि समाजाची युवांप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व.

## युवांना सक्षम करण्यासाठी महत्वपूर्ण घटक





| | |
|---|---|
| • शिक्षण व उच्च शिक्षण<br>• रोजगार व स्वयंरोजगार<br>• पर्यावरण संरक्षण<br>• कला व संस्कृती<br>• नागरिकत्व<br>• कुमार वय | • प्रशिक्षण व कौशल्य विकास<br>• आरोग्य व जीवनपध्दती<br>• क्रीडा व मनोरंजन<br>• विज्ञान व तंत्रज्ञान<br>• सामाजिक सुरक्षा<br>• युवासामाजिक प्रतिष्ठा निर्देशांक (सोशल क्रेडिट) |

" विद्ये विना मती गेली, मती विना नीति गेली,
निती विना गती गेली, गती विना वित्त गेले,
वित्त विना शुद्र खचले, इतके अनर्थ एका
अविद्येने केले "

\- महात्मा जोतीराव फुले



## शिक्षण व उच्च शिक्षण

मनुष्यबळ विकासाचे शिक्षण हे एक महत्वपूर्ण व प्रभावी साधन आहे. तसेच राष्ट्राच्या व राज्याच्या विकासावर मूलभूत परिणाम करणारा घटक आहे. शिक्षणातून युवांना वैचारिक सामर्थ्य, कार्यवृत्ती, भविष्याची प्रेरणादायी दिशा मिळते. देशाच्या उन्नतीत युवांचा समुचित सहभाग असून शिक्षणातून राष्ट्रभक्तीची भावना तयार होते. राज्याची संस्कृती व परंपरा यांची ओळख व जोपासना ही शिक्षणातून जतन केली जाते. आधुनिक जगातील स्पर्धा युगात राज्यातील युवाची वाटचाल सक्षमपणे होण्यासाठी शिक्षणाकडे बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे.

शिक्षण पुरविणे हे शासनाचे घटनात्मक दायित्व असून आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्यादृष्टीने तसेच भविष्यात उज्ज्वल पिढी घडविण्यासाठी शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. युवांच्या शैक्षणिक विकासामध्ये केवळ उच्च माध्यमिक व महाविद्यालयीनच नव्हे तर प्राथमिक शिक्षणाचेही महत्व मोलाचे आहे. याकरिता प्राथमिक शिक्षण सक्तीचे असणे, शिक्षणाचा दर्जा उंचावणे, पायाभूत सुविधा निर्माण करणे, शाळांमधील गळती कमी करणे, शिक्षणाचे सार्वत्रिकरण इ.बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

| फलश्रृती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • समाजातील सर्व प्रकारच्या घटकांना उत्तम प्रतीचे शिक्षण देणे.<br>• शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करणे.<br>• अभ्यासक्रमाचे पुनर्मूल्यांकन.<br>• मुलभूत शिक्षणाचा राज्यभर विकास करणे . | • १८ वर्षापर्यंत सर्व मुलांना अनिवार्य मोफत आणि उत्तम प्रतीचे शिक्षण देणे.<br>• माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील गळतीचे प्रमाण कमी करणे |

- राज्याने शिक्षणाच्या माध्यमातून संविधानिक मूल्यांचे धडे द्यावेत. त्यासाठी आवश्यकता भासल्यास अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येईल.
- माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावरील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. राज्यात सर्वांना शिक्षणाच्या समान संधीची हमी द्यावी. समाजातील वंचित, उपेक्षित घटकांना शिष्यवृत्ती, विनामूल्य शिक्षण आणि वसतिगृहाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यावर विशेष भर द्यावा. शिष्यवृत्ती दराचा वेळोवेळी आढावा घेऊन सुधारणा करण्यात येतील.



- शाळांमधून गळती झालेल्या विद्यार्थी आणि शाळा सोडलेल्या युवांसाठी पर्यायी शिक्षणाची सोय व त्याचबरोबर व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येईल.
- युवांच्या समकालीन गरजा, मूल्यांना प्रोत्साहन आणि कालानुरुप लवचिकतेवर आधारीत अभ्यासक्रम अद्ययावत करण्यात यावेत. यासाठी अशासकीय राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय प्रशिक्षण संस्था व उद्योग समूह यांच्या प्रशिक्षित मनुष्यबळाचा सल्ला व मार्गदर्शन देण्यात येईल.
- शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषदेची पुर्नरचना करुन तिचे स्वरुप एन.सी.ई.आर.टी.च्या समकक्ष केले जाईल व अभ्यासक्रमाचे नियमित पुनरावलोकन करण्यात येईल.
- शैक्षणिक अभ्यासक्रम हे वैज्ञानिक दृष्टीकोन, अनुभवाधारित आकलन, पर्यावरणाबाबत जागरुकता, व्यावसायिक शिक्षणावर भर आणि स्वदेशी, पारंपारिक ज्ञान संपदेचा आदर यांना प्रोत्साहन देणारे असावेत. जीवन कौशल्य शिक्षणाचा अंतर्भाव शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात केला जाईल.
- शैक्षणिक संस्थांतील अध्यापन-अध्ययनाची प्रक्रिया बळकट करण्यासाठी मुलभूत पायाभूत सुविधा, शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षकांची उपलब्धता आणि किमान प्रशिक्षणात कमाल दर्जा उंचावणे तसेच माहिती व तंत्रज्ञान, प्रशिक्षण केंद्रे आदी सोयीसुविधा तालुका व जिल्हास्तरावर उपलब्ध करुन द्याव्यात यासाठी राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांना मानके समान असावीत. निरंतर शिक्षणासाठी तालुकास्तरावर शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी पायाभूत सुविधा व केंद्र विकसित करण्यात येईल.
- खाजगी क्षेत्रातील शिकवणी वर्गाचे संनियंत्रण करण्यासाठी राज्याने मानके आणि नियामक यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल.
- विद्यापीठांनी युवांना मराठी भाषेतून उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी मराठीतून संदर्भ आणि अभ्यास साहित्य उपलब्ध करुन देण्याची तरतूद करावी. संगणक प्रणाली मराठीतून विकसित करण्यात येईल.
- शालेय अभ्यासक्रमात कृषि व पूरक व्यवसाय, नागरी भागातील सेवा संधी, व्यवस्थापन, संवाद कौशल्य, संविधान ओळख, विधी साक्षरता, नागरिकत्व आणि समाजकार्य यासारखे नवे विषय अंतर्भूत करण्याबाबत विचार करण्यात येईल.
- युवांना स्वयंसेवी कार्य आणि समाजसेवेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल.
- युवांच्या विकासाच्यादृष्टीने हितकारक ठरतील अशा शासकीय समित्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी करुन त्यात कालसुसंगत सुधारणा करण्यात येईल.

- शैक्षणिक संस्थांनी युवांना समुपदेशन, रोजगार-स्वयंरोजगार मार्गदर्शन, प्रशासकीय सहायता करण्याबाबतच्या केंद्राची स्थापना करण्यात येईल.
- युवांना शिक्षण/उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी निरंतर शिक्षण, दूरस्थ शिक्षण आणि मुक्त शिक्षण देणाऱ्या विद्यापीठे/संस्थांना विशेष प्राधान्याने प्रोत्साहन देण्यात येईल.
- प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणामध्ये वाढलेले खाजगीकरण लक्षात घेता यामधील वाढत्या नफेखोरीला आळा घालण्यासाठी **शुल्क नियामक प्राधिकरण** स्थापन करण्याकरिता कायदा करण्यात येईल.
- विविध विद्यापीठांतून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या माहितीचे संगणकीकरण आणि संकलन करण्यात येईल जेणेकरुन विद्यार्थ्यांना दुसऱ्या विद्यापीठात प्रवेश घेताना स्थलांतरण प्रमाणपत्र सहज उपलब्ध होऊ शकेल. ग्रामीण भागातील शाळां, आदीवासी शाळांना शासनाने सर्वातोपरी सहाय्य करण्यात येईल.
- शारीरिक समस्या, व्यसनमुक्ती व प्रजनन आणि एच.आय.व्ही.(एड्स),
  राष्ट्रीय एकात्मता, हिंसा, आंतकवाद, तसेच लोकसंख्या समस्यांबाबत माहिति देण्यात येईल.
- शासनाच्या धोरणांची व विविध विभागाच्या योजनांची माहिती अभ्यासक्रमातून महाविद्यालयातील युवांना देण्यात येईल.
- युवांच्या आवश्यकतेनुसार आणि गरजेनुसार त्यांना विविध क्षेत्रात आधार देण्यात येईल. जे युवा शाळाबाहय होण्याची शक्यता आहे अशांना विशेष आधार देण्यात येईल.
- शारीरिक व मानसिक समस्या असणाऱ्या तसेच अनाथ युवांसाठी शिक्षणविषयक खास प्रयत्न करण्यात येईल.
- शासनाने सर्व स्तरावर परीक्षांच्या धोरणात सातत्य ठेवताना, यामध्ये विशिष्ट कालावधी गेल्यानंतर सुधारणा करणे योग्य असले तरी परीक्षार्थींवर मानसिक ताण येऊ शकणारे वेळी अवेळीचे बदल टाळावेत.
- शालेय प्रवेश पध्दती ही घटनादत्त आरक्षणाचा सन्मान ठेवतानाच गुणवत्तेला किमान न्याय देणारी असेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध समाज घटकांसाठी अल्पसंख्यांक दर्जाने सुरु झालेल्या महाविद्यालयांचे अधिकार तपासून सुधारणा करण्यात येईल.
- शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रियेसाठीचे निकष चाचणी पध्दत व व्यवस्थापनाचा कोटा याबाबतचे दीर्घकालीन धोरण ठरविण्यात येईल, जेणेकरुन प्रवेश प्रक्रिया हा मूळ अभ्यासक्रमापेक्षा मानसिक ताणाचा विषय युवा वर्गासाठी ठरणार नाही.

## प्रशिक्षण व कौशल्य विकास

**“सर्व जगात प्राप्त झालेले संपूर्ण ज्ञानभांडार हे आपल्या मनातून आलेले आहे, कारण अखिल विश्वाचा ज्ञानकोश हा मानवी मनात विराजमान आहे.”**

**- स्वामी विवेकानंद**



जागतिकीकरणाच्या युगात सक्षम युवा विकासासाठी व्यवस्थापन कौशल्य, बहुस्पर्शीत्व, बहुशाखीय कौशल्य, आंतरविद्याशाखीय कौशल्य, व्यक्तिमत्व विकास कौशल्य ही सार्वत्रिक अनिवार्य व्यावसायिक कौशल्य ठरली आहेत. सद्य:स्थितीत औपचारीक शिक्षण व्यवस्था ही मुख्यत्वे ज्ञानाधारीत (सैध्दांतिक कौशल्य/पुस्तकी ज्ञान) असल्याने, व्यावसायिक दृष्टीकोनाचा विकास आणि नवीन कौशल्य आत्मसात करण्याची गरज आहे. यासाठी शिक्षणाबरोबरच उपजिविका, रोजगार-स्वयंरोजगारासाठी तांत्रिक शिक्षणाची ओळख करुन प्रशिक्षण व कौशल्य क्षमता विकसित करणे युवांच्या भविष्याच्या जडण-घडणीसाठी आवश्यक आहे.



| फलश्रृती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • प्रशिक्षित व कौशल्यपूर्ण विकासाचे तंत्रामध्ये वाढ व विकास करणे | • महाराष्ट्र कौशल्य विकास संस्थेची स्थापना करणे<br>• राज्याचा विकास लक्षात घेता कौशल्य विकास कार्यक्रमात मुलभूत व कालानुरुप प्रशिक्षणाचा अंतर्भाव असावा.<br>• प्रशिक्षित युवांची माहिती संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावी. |

- **औपचारिक शिक्षण घेतलेल्या तसेच विविध व्यवसाय करणाऱ्या युवांना कौशल्य विकासाचे निरंतर प्रशिक्षण देणारी यंत्रणा विकसित करणे.**
- **भारत सरकारच्या राष्ट्रीय ज्ञान आयोग आणि प्रस्तावित राष्ट्रीय कौशल्य विकास संस्थेशी संलग्न असणारी महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था राज्यात स्थापन करणे.**
- **राज्याच्या विकासाचा विद्यमान टप्पा लक्षात घेऊन प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमात, मुलभूत व कालानुरुप कौशल्य विकास प्रशिक्षणाचा अंतर्भाव असावा. जे तांत्रिक, बिगर तांत्रिक, व्यवस्थापन, बिगर व्यवस्थापन आणि स्वयंउद्योजकता क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर फायदेशीर ठरेल.**
- युवांना उद्योजकता व बाजाराधिष्ठित कौशल्य क्षमता प्रदान करण्यावर विशेष भर देण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) प्रभावी कराव्यात. उपजिविकेच्या चांगल्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी खाजगी क्षेत्रासह सार्वजनिक क्षेत्रात भागीदारीच्या शक्यता पडताळून पहाव्यात.
- धोरणाच्या महत्वपूर्ण घटकातील प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी युवांना प्रोत्साहन द्यावे.
- राज्याच्या भौगोलिक परिस्थितीची विविधता, उपलब्ध साधन संपत्तीचा विचार करुन साक्षर, निरक्षर, विकलांग तसेच वंचित युवांना उपयोगी ठरतील असे कौशल्य व उद्योजकता विकास अभ्यासक्रम सुरु करण्यात यावेत. याबरोबरच संवाद कौशल्य, स्वयंजागृती, वाटाघाटी कौशल्य, संघभावना, चातुर्य असे गुण युवांमध्ये विकसित करण्यासाठी जाणीवपूर्वक नियोजन करावे.
- विविध कौशल्य विकास अभ्यासक्रम घेण्यासाठी इच्छूक स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन द्यावे.

- प्रशिक्षण किंवा कौशल्य विकास अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणा-या युवांना किंवा स्वयंसेवी युवा गटांना स्वतःचा उद्योग सुरु करण्यासाठी बँक किंवा अन्य वित्तीय संस्थांनी सूक्ष्म पत धोरणाला प्रोत्साहन देऊन माफक व कमी व्याजदराने पत पुरवठा करावा.
- रोजगार उपलब्ध करुन देणा-या आणि प्रशिक्षित उमेदवारांच्या शोधात असलेल्या संस्थांच्या उपयोगासाठी युवा उमेदवारांची सविस्तर संगणकीकृत माहिती/गोषवारा जिल्हास्तरावर संबंधित विभागाने एकत्रित करावी. ती नियमित अद्ययावत करुन संकेत स्थळावर उपलब्ध असावी आणि त्याचा प्रचार-प्रसार करावा. यात समन्वय असण्यासाठी सध्याची यंत्रणा प्रभावी करावी.
- महिला युवांच्या कौशल्य विकासासाठी राज्याने व्यापक प्रमाणात महिला युवांना कौशल्य प्रशिक्षण द्यावे.
- युवांना कौशल्य प्रशिक्षण देत असातना मराठी भाषेला प्रोत्साहन द्यावे परंतु जागतिक भाषा व रोजगाराच्या संधी यासाठी इंग्रजी भाषासुध्दा शिकण्याबाबत प्रोत्साहित करावे.
- केंद्रशासनाने सन २००९ मध्ये शिक्षणाच्या हक्काचा कायदा अंमलात आणलेला आहे. या धर्तीवर व्यवसाय शिक्षण कायदा आवश्यक आहे.
- प्रशिक्षण व कौशल्याच्या संधीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याच्यादृष्टीने युवांनी स्वतःचे पॅनकार्ड, बँकखाते, पासपोर्ट तयार करावेत व त्यासाठी युवांना प्रोत्साहित करण्यात यावे.
- राज्यात जास्तीत जास्त तांत्रिक प्रशिक्षित युवा मिळण्यासाठी पूर्वतांत्रिक व पूर्वव्यावसायिक शिक्षण देणा-या शाळांच्या संख्येत वाढ करण्यात यावी.
- व्यवसाय शिक्षण अधिक प्रगत व अद्ययावत राहण्यासाठी कारखान्यांनी कामगार युवांना नियमित प्रगत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
- विदेशातील काही व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचे मराठीत भाषांतर करुन युवांना उपलब्ध करुन देण्यात यावे.
- सध्या राज्यातील सर्व व्यावसायिक प्रशिक्षण संस्था, रोजगार प्रशिक्षण संस्था यामध्ये तांत्रिक व सेवानिगडीत अभ्यासक्रम शिकवले जातात. परंतु आपल्या राज्यातील बहुतांशी युवा अजूनही ग्रामीण भागाशी व शेतीशी निगडीत असल्यामुळे कृषी विषयक पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन व अन्य कुटीर व्यवसाय यांना रोजगार व व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात यावे. कृषि क्षेत्राशी निगडीत अभ्यासक्रमाची व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे विकसित करण्यात यावीत.



- व्यवसाय, कौशल्य, तंत्र, सेवा प्रशिक्षण घेतलेल्या राज्यातील युवांची नोंदणी आवश्यक आहे. प्रत्येक प्रशिक्षित युवांचा ऑनलाईन प्रोफाईल असणे गरजेचे आहे. आणि सदरील प्रोफाईल हा मराठी, हिंदी, इंग्रजी, फ्रेंच,स्पॅनिश, जपानी व रशियन भाषेमध्ये असावा. तसेच आंतराष्ट्रीय स्तरावर आपल्या कौशल्याच्या आधारे रोजगार मिळवू इच्छिणा-या युवांना पाश्चिमात्त्य भाषा शिकण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- **तांत्रिक व्यवसायामध्ये पारंगत असणा-या युवांना समाजात प्रतिष्ठा मिळण्यासाठी तंत्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश देऊन प्रमाणपत्र देण्यात यावे.**
- **ग्रामीण भागातील भौगोलिक साधन संपत्तीच्या उपयोगितेनुसार युवांकरीता युवा विकासाचे कार्य करणा-या संस्थांच्या सहाय्याने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये स्त्रिया व विकलांगांसाठी विशिष्ट सवलती असाव्यात.**
- **तांत्रिक कौशल्य, आणि विविध व्यवसाय इ.बाबतचे शिक्षण माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना देण्यासाठी राज्यशासनाने विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी. तसेच प्रशिक्षण व कौशल्य असणा-या कुशल युवांसाठी रोजगाराच्या संधी उद्योगसमूहांमध्ये उपलब्ध कराव्यात.**

* विकलांग विद्यार्थ्यांसाठी शालेय जीवनात व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी आधार द्यावा त्यांना व्यवसाय व नोक-यांमध्ये विशेष लाभ द्यावेत, कराच्या विशेष सवलती असाव्यात.
* युवकांच्या संख्या, उपलब्ध रोजगाराची संधी, प्रशिक्षण अभ्यासक्रम यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

"एकत्र येणे हा प्रारंभ आहे, एकत्र रहाणे ही प्रगती आहे, आणि एकत्र काम करणे हे यश आहे."

\- हेन्री फोर्ड



## रोजगार व स्वयंरोजगार



रोजगार निर्मिती ही शासन व आर्थिक नियोजनकार यांचे लक्ष वेधून घेणा-या प्रमुख प्राधान्यक्रमापैकी एक असल्याने पंचवार्षिक योजनांमध्ये रोजगार निर्मितीकडे विकासाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून विशेष लक्ष दिले आहे. रोजगार निर्मिती वाढीचा वेग हा देशांतर्गत स्थूल उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा खूप कमी आहे तसेच श्रमशक्तीवाढीचा दर लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा जास्त आहे. त्यामुळे जी.डी.पी. वाढ रोजगार निर्मिती दराच्या प्रमाणात नाही.

रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून युवांना स्वावलंबी जीवन जगता येईल असे पोषक वातावरण निर्माण करणे, मुलभूत सोयींचा विकास, तांत्रिक कौशल्य, विपणन व्यवस्था, नियोजन या महत्वपूर्ण बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

| फलश्रृती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • स्वयंरोजगार वातावरण निर्मिती करुन युवांना स्वावलंबी बनविणे | • युवकांसाठी पाच वर्षासाठी स्वयंरोजगाराचा मसुदा तयार करणे. |
| • रोजगार व स्वयंरोजगार यांचे प्रमाण वाढविणे | • स्वयंरोजगार व रोजगारावर आधारीत विविध ठिकाणी एक खिडकी योजना राबविणे. |
| • रोजगारासाठीचे स्थलांतरण कमी करणे | • युवा शेतक-यांना खास आर्थिक सहाय्य देणे. |

* राज्याचा पंचवार्षिक युवा रोजगार-स्वयंरोजगार-उपजिविका कृती आराखडा तयार करावा. दर पाच वर्षाने अंमलबजावणीचा प्रभाव आणि परिणामकारकता याचा आढावा घ्यावा. या प्रस्तावित कृती आराखड्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना करावी. या कृती आराखड्यात सामाजिक व खाजगी क्षेत्राच्या सहभागाच्या शक्यता पडताळून पहाव्यात.
* युवांना एक खिडकी योजनेद्वारे रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या योजनांची माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी. यासाठी सद्य:स्थितीतील रोजगार मार्गदर्शन केंद्रांची पुनर्रचना करावी. युवांना जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी या केंद्राद्वारे रोजगार संधीची अद्ययावत माहिती नियमितपणे देण्यात यावी.

- युवांना उपजिविकेच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्याने गाव पातळीवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन रोजगार निर्मितीच्या शक्यता पडताळून पहाव्यात.
- बेराजगारीमुळे होणारे सक्तीचे स्थलांतर रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर उपजिविकेच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.
- युवांना किमान वेतन कायद्यान्वये वेतन/मोबदला/मजुरी देण्याबाबत कार्यवाही करावी, त्यासाठी भारत सरकारने केलेल्या शिफारशीनुसार मजुरीच्या दराचा आढावा घ्यावा आणि घाऊक मूल्य निर्देशांक व जगण्याच्या खर्चाच्या निर्देशांकावर आधारित त्याचा ठराविक काळानंतर वेळोवेळी सुधारणा करावी.
- मानवी शक्तीच्या गरजा आणि मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी कृती दल स्थापन करण्याबाबत विचार करावा. हे कृती दल सद्य:स्थितीतील शिक्षणातून विकसित होणारे कौशल्य आणि कृषि, उत्पादन व सेवा क्षेत्र यासारख्या क्षेत्रांसाठी प्रत्यक्षात आवश्यक असलेली कौशल्ये व या दरम्यानची पोकळी निश्चित करेल आणि ती भरुन काढण्यासाठीच्या उपाययोजना सुचवेल.




- प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर कमवा आणि शिका योजनेला प्रोत्साहन द्यावे आणि महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना अर्धवेळ काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या युवांना प्रोत्साहित करावे.
- असंघटीत क्षेत्रात काम करणा-या युवांसह हंगामी, अकुशल आणि कमी वेतनाचा रोजगार करणा-या युवांसाठी रोजगार संधीचे सातत्याने नियमन करावे.
- विविध क्षेत्रात विविध काम करणा-या युवांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांना गती द्यावी.
- तालुका पातळीवर रोजगार, मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करावीत. ही केंद्र विविध योजना व कार्यक्रमांच्या माहितीसाठी सर्व मंत्रालये, विभाग व खाजगी क्षेत्राशी जोडलेली असावीत. स्वयंसेवी संस्थांना अशी केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन व समर्थन देण्यात यावे.
- युवांसाठी रोजगाराच्या संधी म्हणून कृषि आणि कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. अन्नप्रक्रीया व वेष्टन बांधणी, साठवण व्यवस्था, दळणवळण आणि कृषि पर्यावरण, पर्यटन आदि कृषि आधारित उद्योगांचा त्यात अंतर्भाव असावा.
- राज्यातील कृषि संशोधन केंद्राच्या माध्यमातून प्रगतिशील युवा शेतक-यांना प्रोत्साहन द्यावे. या केंद्रांनी कृषि आर्थिक व्यवहार प्रक्रिया, सेंद्रिय/नैसर्गिक शेती आणि शास्त्रशुध्द शेतीवर विशेष लक्ष केंद्रीत करावे.
- कोरडवाहू शेती करणा-या युवा शेतक-यांना वित्तीय किंवा तत्सम प्रोत्साहन द्यावे आणि शेती हे उपजिविकेचे उत्पादक व फलदायी साधन आहे याची जाणीव करुन द्यावी.
- कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेत युवा महिला करीत असलेल्या घरकामाला उत्पादक योगदान म्हणून मान्यता व प्रतिष्ठा द्यावी. कुटुंब अर्थव्यवस्थेतील महिलांच्या उत्पादक योगदानाचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करावी.
- रोजगार हमी योजना शहरी भागात राबविण्याबाबत विचार करण्यात यावा.
- स्वयंरोजगार करणा-या युवांना व्यावसायिक क्षेत्रात नगर रचना करताना प्राधान्याने जागा देण्यात यावी.

- युवा स्वयंसहाय्यता गटांच्या वस्तू, सेवाचे उत्पादन व विपणन करण्यासाठी सहकार चळवळीच्या माध्यमातून प्रोत्साहन व पाठबळ देण्यासाठी शासनाने मदत करावी.
- तांत्रिक व्यवसायामध्ये पारंगत असणा-या युवांना समाजात प्रतिष्ठा मिळण्यासाठी तंत्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश देऊन प्रमाणपत्र देण्यात यावे.
- रोजगार, स्वयंरोजगारामध्ये विकलांग व्यक्तींना नोकरीच्या संधी अवगत करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. शिक्षण व कामगार क्षेत्रात अशा व्यक्तींचे विशेष सर्वेक्षण करुन त्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.
- रोजगार, स्वयंरोजगाराच्या उपलब्ध संधी यांच्याविषयीची जागृती पालकवर्गात करावी. व्यवसाय करण्यासाठी पुढे येणा-या युवांना तांत्रिक साधनसामुग्री व व्यवस्थापनासाठी सहाय्य व योग्य ते मार्गदर्शन करावे.
- आदीवासी तथा अतिमागास जाती जमातीमधील युवांमध्ये शैक्षणिक तथा रोजगार, स्वयंरोजगार बाबत जाणीव जागृतीचे विशेष प्रयत्न करण्यात यावे.
- भौगोलिक साधन संपत्तीच्या आधारावर शासनाने स्थानिक स्तरावर रोजगार, प्रगत व्यवसाय व त्या संबंधित भागाची विशेष ओळख जपण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घ्यावा जेणेकरुन स्थानिक लोक त्याकडे आकर्षीले जातील व त्याचठिकाणी राहून आवडीने व्यवसाय करतील.
- विविध उद्योग समूहात अधिकाधिक रोजगार निर्मिती हा निकष प्राधान्य ठरवून विविध प्रोत्साहनपर योजना देण्यात याव्यात.

**“ आरोग्य ही सर्वात मोठी देणगी आहे, समाधान ही सर्वात मोठी संपत्ती आहे, तर विश्वास हे उत्तम नातं आहे. ”**

**- बुध्द**




## आरोग्य व जीवनपध्दती

आरोग्य हा सर्व नागरिकांचा अधिकार आहे. आरोग्य ही शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विकासाची अवस्था असून केवळ रोग व शारीरिक अगर मानसिक दर्बलतेचा अभाव म्हणजे आरोग्य नव्हे. उत्साह, लवचिकता, अधीरता, अविश्रांत आणि जोखीम पत्करणे ही युवांची वैशिष्ट्ये आहेत. या स्वभाव घटकांमुळे युवांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम उदा. आत्महत्या, व्यसनाधिनता, लैंगिक आजार, मानसिक ताण, गुन्हेगारी, अस्वच्छतेचे दुष्परिणाम इ. होऊ शकतात.





सकारात्मक जीवन शैलीसाठी चांगले आरोग्य असणे ही महत्वाची बाब असून यासाठी युवांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. युवांच्या आरोग्यासाठी आरोग्यसेवांची सहज उपलब्धता, समान वितरण, स्थानिक नागरिकांचा सहभाग, अद्ययावत सुविधा व तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. आरोग्यदायी समाजासाठी युवांचा सहभाग महत्वाचा आहे.

> “ स्वच्छ होण्यासाठी फाटावे लागते. पवित्र होण्यासाठी जाळून घ्यावे लागते आणि अंकुरित होण्यासाठी गाडून घ्यावे लागते.”
>
> साने गुरुजी.



| फलश्रुती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • आत्महत्याचे प्रमाण कमी करणे<br>• एच.आय.व्ही बाधित युवांची संख्या कमी करणे<br>• मुलींच्या लग्नाचे वय १८ वर्ष ठरविलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करणे | • ग्रामीण व शहरी भागातील युवकांच्या गरजा भागविण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनची स्थापना करणे<br>• व्यायाम ,योगा-प्राणायाम यांच्या व्दारे युवांना अतिउत्तम आरोग्य मिळविण्यासाठी प्रोत्साहित करणे |





- आरोग्य विषयक कार्यक्रमांचे परिणामकारक नियोजन व अंमलबजावणीसाठी आरोग्य निर्देशांकाची विश्वसनीय आणि अद्ययावत माहिती उपलब्ध असावी.
- आरोग्यदायी जीवनासाठी अन्न घटकातील पोषक तत्वांच्या महत्वासंबंधीची जाणीव जागृती करावी. त्याचबरोबर पोषक आहाराचे महत्व जागविण्यासाठी खाद्यान्नावर कार्बोदके, जीवनसत्वे आणि पोषक तत्वे नमूद करणे बंधनकारक करावे.
- विशेषत: युवांच्या गरजा लक्षात घेऊन राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची परिणामकारक अंमलबजावणी करणे. याच धर्तीवर शहरी भागासाठी सर्वंकष राज्य नागरी आरोग्य अभियान सुरु करावे.
- युवांच्या मानसिक आरोग्यासाठी शालेय, महाविद्यालयीन व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर समुपदेशन केंद्रे स्थापन करावीत. तालुका पातळीवर व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र स्थापन करावीत.
- आरोग्यपूर्ण जीवनशैलीसाठी आरोग्यविषयक शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन जीवन कौशल्य शिक्षणाचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करावा. युवांमध्ये वैयक्तिक, कौटुंबिक व सार्वजनिक स्वच्छतेबाबतची जाणीव रुजविण्याकरिता त्यांना बाल्यावस्थेपासून आरोग्य स्वच्छता शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावेत.
- युवांमध्ये एच.आय.व्ही. व लैगिक आजार याबाबतच्या गंभीर दुष्परिणामांची जाणीव जागृती निर्माण करावी.
- राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सर्व स्तरांवरील युवांना प्रोत्साहक, उद्‌बोधक, समन्वय कार्यकर्ता, आरोग्य संदेशवाहक, आरोग्य सेवक, समन्वयक अशा स्वयंसेवकांची फळी निर्माण करावी. जेणेकरुन नैसर्गिक आपत्ती, साथीच्या रोगांच्या प्रादुर्भाव आणि आरोग्य जनजागृतीसाठी युवा स्वयंसेवक उपलब्ध होऊ शकतील.
- आरोग्य विषयक कार्यक्रमांत उल्लेखनीय कार्य करणा-या युवांना पुरस्कार देण्यात यावेत.

- शारीरिक आणि मानसिक दौर्बल्य, आजारपणाची प्राथमिक लक्षणे, सामान्य मानसिकतेतील फरक आणि आत्महत्येच्या प्रवृत्ती ओळखणे आदींबाबत शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षकांनी युवांचे उद्‌बोधन करण्यासाठी प्रशिक्षण द्यावे.



- मुलींसाठी १८ आणि मुलांसाठी २१ वर्षांनंतर लग्न करण्याबाबत प्रामुख्याने ग्रामीण व आदिवासी भागात जनजागृती करावी. तसेच बालविवाह प्रतिबंध कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करावी.
- सार्वजनिक ठिकाणी आणि कामांच्या ठिकाणी अपंगांना सहज संचारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.
- युवांवर विशेष लक्ष केंद्रित करुन राज्याने राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी.
- मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी व शारीरिक सुदृढतेकरिता शारीरिक व्यायाम, योगा व ध्यान यांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी.

**“ थेंबा थेंबाचे रुपांतर सागरात होते, हे सर्वांना माहितच आहे, परंतु सागरही थेंबाथेंबात परावर्तीत होत असतो, हे थोडेच लोक जाणतात. ”**

**- संत कबीर**

## पर्यावरण संरक्षण



जीवनमानाचा दर्जा समतोल राखण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे आवश्यक आहे. यासाठी नैसर्गिक स्त्रोतांची जाणीवपूर्वक जोपासना करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासन विविध उपाययोजना, अधिनियमाद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तथापि नागरिंकानी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

जगात पर्यावरणाचा ऱ्हास ही मोठी समस्या आहे. शासनाच्या पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन धोरणाच्या आखणी आणि अंमलबजावणीत युवांना अधिकाधिक संधी उपलब्ध करुन देण्यात यावी. पर्यावरण संरक्षण व संवर्धन कार्यक्रमात, युवांचा सहभाग लोकजागृतीच्या व्यापक मोहिमेत वाढविणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय हरित सेना कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी युवांना सहभागी करणे आवश्यक आहे. भौगोलिक परिस्थितीला अनुकूल अशा रोपांची उपलब्धता करुन रोपांचे संवर्धन व जतन करण्यासाठी युवांना प्रोत्साहित करण्यात यावे. यामध्ये स्थानिक युवा गट व स्वयंसेवी संस्थांनाही सहभागी करुन घेण्यात यावे.

- पर्यावरण रक्षण आणि जैविक विविधता कायद्याच्या अंमलबजावणीबाबत युवांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी गाव, शहर, शाळा आणि महाविद्यालयात निसर्ग संवर्धन मंडळे स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात यावे.
- युवांना क्रमिक अभ्यासक्रमाद्वारे मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षकांना पर्यावरण आणि वातावरण विषयांचे प्रशिक्षण देण्यात यावे.

- पर्यावरणाचे संवर्धन, जलपुर्नभरण, जलसाठयांचे जतन करण्यासाठी युवा गट आणि संघटना तसेच राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, नेहरु युवा केंद्र यांच्या माध्यमातून प्रोत्साहन द्यावे.

| फलश्रृती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
| --- | --- |
| • युवांमध्ये पर्यावरणाबद्दलची जागृती निर्माण करणे<br><br>• युवांचा पर्यावरण संरक्षण योजनांमधील सहभाग वाढविणे | • युवांनी पर्यावरण संरक्षण आणि जैविक विविधता यांचेविषयक प्रकल्प राबवावेत.<br>• शाळा, महाविद्यालयामध्ये पर्यावरण व्यवस्थापना विषयी प्रशिक्षणांचे आयोजन करावे<br>• वृक्षरोपण व वनसंरक्षणामध्ये युवांचा सहभाग वाढविणे |

- गाव, शाळा व महाविद्यालयांसारख्या शैक्षणिक संस्था, कामांची ठिकाणे आणि शहरांच्या हरित मानक प्रकल्पात युवकांचा पर्यावरण संवर्धनासाठी सहभाग वाढविण्यावर भर द्यावा.
- पर्यावरण क्षेत्रात संशोधन, रोजगार, व्यवसाय निर्माण करण्यासाठी युवांना प्रोत्साहित करावे.
- खाजगी क्षेत्र आणि समाजामध्ये पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढविण्यासाठी युवा गटांमार्फत प्रोत्साहन देण्यात यावे.
- शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम व प्रशिक्षणांमध्ये स्थानिक युवा गटांना सहभागी करुन घेण्यात यावे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणामध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात यावा.
- शासनाच्या विविध वृक्षारोपण योजनांमध्ये तसेच राज्यात विविध ठिकाणी उपक्रम हाती घेत असताना स्थानिक जातींच्या रोपांची जोपासना करण्याबरोबर स्थानिक युवा गट व स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहित करावे. त्यांना कचरा व्यवस्थापन ,खत निर्मिती याविषयी प्रशिक्षण द्यावे.
- कृषि साहीत्याचा प्रसार व प्रचार करुन त्याचा योग्य सन्माण करावा.नवोदित कृषि साहीत्य निर्माण करण्यासाठी साहीत्य संमेलन आयोजित करावेत अथवा साहीत्य संस्थांना मदत करावी.

**“ माझ्यासाठी सामना हा प्रत्यक्षातील सामन्याच्या कितीतरी आधीच सुरु झालेला असतो. ”**

**- सचिन तेंडूलकर**



## क्रीडा व मनोरंजन


मनोरंजन आणि खेळ हे युवांच्या सर्वांगिण विकासातील महत्वाचे घटक आहेत. खेळामुळे शारीरिक क्षमतेत वृध्दी, सकारात्मक स्वयंसंकल्पनांचा विकास आणि सहिष्णुता, सांघिक भावना व आरोग्य संवर्धन यांसारखी मूल्ये आणि कौशल्ये विकसित होतात. धर्म, जात,

पंथ, प्रांत, वंश व आर्थिकस्तर इ. बाबींचा भेदभाव न करता खेळ ही सर्व लोकांना एकत्र आणणारी वैश्विक शक्ती आहे. युवांमधील ताणतणाव कमी करणे व फावल्या वेळेचा सदुपयोग आणि सुप्त गुणांना संधी मिळण्यासाठी मनोरंजनात्मक बाबी आवश्यक आहेत.

| फलश्रुती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • युवांचा क्रीडा व मनोरंजनातील सहभाग वाढविणे | • दिवसातील २० टक्के वेळ क्रीडा व मनोरंजनाच्या पूरक बाबीसाठी राखीव ठेवण्यात यावा<br>• क्रीडा व मनोरंजन केंद्रासाठी राखून ठेवलेले भूखंड विकसित करावेत<br>• युवांच्या सुप्त गुणांना संधी मिळण्यासाठी तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर क्रीडा व मनोरंजन बाबीचे विविध उपक्रम, स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात |

- औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण देणा-या सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांमध्ये मनोरंजन आणि खेळाच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करण्यासाठी त्यासंबंधीच्या नियमांचे सक्षम प्राधिकाऱ्याने कालबध्द पुनर्विलोकन व अंमलबजावणी करावी.
- शैक्षणिक संस्थांमध्ये एकूण तासिकांच्या एकपंचमांश वेळ क्रीडा आणि मनोरंजन किंवा अभ्यासक्रमपूरक उपक्रमांसाठी राखीव ठेवावा.
- शासनाने वाडी, गावे, जिल्हा व विभाग स्तरावर 'युवा गट' हे राज्यस्तरावरील मनोरंजन आणि क्रीडा कार्यक्रमासाठी घटक म्हणून विचारात घ्यावेत; याकरिता शासनाने अशा प्रकारच्या युवागटांची नोंदणी करणारी यंत्रणा विकसित करावी. युवा गटांना कार्यान्वित करण्यासाठी स्थानिक स्वराज संस्था, स्थानिक युवा मंडळे, शैक्षणिक संस्था यांच्या माध्यमातून समन्वय साधून प्रोत्साहन देण्यात यावे.
- स्थानिक युवा गटांमध्ये उपेक्षित युवक आणि युवतींचा सहभाग वाढविण्याकरिता परिणामकारक उपाययोजना करण्यात यावी.
- क्रीडा आणि मनोरंजनाच्या विकासासाठी भूखंड आरक्षित ठेवावे. सदर भूखंड विकसित करुन, नगरपालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांनी युवांना उपलब्ध करुन द्यावे. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखालील सार्वजनिक स्थळ युवांच्या उपक्रमांसाठी प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावेत.
- सर्व नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्र आणि ग्रामीण भागाच्या बृहत आराखडयामध्ये खेळाचे क्रीडांगण विकसित करण्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. या क्रीडांगणाचे व्यवस्थापन स्थानिक क्रीडा संस्था/मंडळाकडे असावे.
- राज्यातील खेळाडूंसाठी क्रीडाविषयक पायाभूत व अद्यावत सुविधा, प्रशिक्षण इ.बाबींकडे लक्ष देऊन राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी करण्यास प्रोत्साहित करावे.
- विविध क्रीडा प्रकारात युवती, अपंग व दुर्गम भागातील युवांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.
- युवांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन व संधी उपलब्ध करुन देण्यासाठी तालुका ते राज्यस्तरावर दरवर्षी युवा महोत्सवांचे आयोजन करण्यात यावे. महोत्सवाच्या व्यवस्थापनात युवा मंडळांना सहभागी करुन घ्यावे.
- साहसी उपक्रमांच्या माध्यमातून युवांमध्ये नेतृत्व गुण, स्वावलंबन, धैर्य, शिस्त आणि पर्यावरणाविषयी आस्था व अभ्यासूवृत्ती इ. गुणांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

- साहसी क्रीडा प्रकाराचे सैध्दांतिक प्रशिक्षण देण्यासाठी साहसी क्रीडा अकादमी स्थापन करावी. या अकादमीद्वारे युवांमध्ये साहसी क्रीडा प्रकाराची आवड निर्माण करुन नियमित प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच प्रशिक्षकांसाठी विविध अभ्यासक्रम कार्यान्वित करावे. साहसी क्रीडा प्रकारातील सुरक्षितता ही महत्वाची बाब असल्याने यासंबंधीची नियमावली व प्रमाणिकरण निश्चित करण्यात यावे.
- महाराष्ट्र राज्याला क्रीडा संस्कृतीचा मोठा वारसा आहे. त्याची जोपासना व संवर्धनासाठी राज्याच्या क्रीडा धोरणातील शिफारशी व उपाययोजना यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी.
- सरकारने स्थानिक रंगभूमी, पथनाट्य चळवळ, खुले रंगमंच सादर करणारे युवा गट व अन्य सांस्कृतिक गटांना प्रोत्साहन व पाठबळ द्यावे.



**"देशाची संस्कृती ही त्या देशातील लोकांच्या मनात व आत्म्यात वास्तव्य करते."**

**- महात्मा गांधी**

## कला व संस्कृती

कला आणि संस्कृती समाजाला ज्ञानसंपन्न करणाऱ्या मूलभूत मनोरंजनात्मक बाबी आहेत. त्यामुळे शासनाने सर्व प्रकारच्या कला आणि संस्कृतींना प्रोत्साहन आणि चालना देणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्र राज्याचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी युवांमध्ये कला आणि संस्कृती विषयक आवड निर्माण होईल असे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायासाठी पोषक तत्वांचे संवर्धन, सांस्कृतिक वारसांशी बांधिलकी आणि सर्वांसाठी न्याय व सन्मान प्रदान करणे यासाठी युवांमध्ये कला तसेच संस्कृतीबाबत जाणीव निर्माण होणे महत्वाचे आहे.

| फलश्रुती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • शहरी व ग्रामीण भागातील युवांना कला व विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे<br>• लग्नानंतरही युवतींचे सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागातील सातत्य कायम राखणे | • कला व संस्कृतीमधील विविध संशोधनासाठी युवांना शिष्यवृत्ती देणे<br>• जिल्हा, तालुका स्तरावर उत्कृष्ट कलाकेंद्र उभारणे<br>• युवा विचारांच्या आदान-प्रदानासाठी कार्यक्रमाचे आयोजन<br>• कला व संस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी विविध माध्यमांचा उत्तमरित्या वापर करणे |





- स्थानिक परंपरा, सांस्कृतिक आदान-प्रदान आणि मौखिक साहित्य यांचे विविध माध्यमातून दस्ताविजीकरण करण्यासाठी युवांना प्रोत्साहन आणि पाठबळ द्यावे. तसेच याबाबत संशोधन करणाऱ्या युवांसाठी विशेष शिष्यवृत्ती सुरु करावी.
- युवांना सांस्कृतिक संबंध आणि सांस्कृतिक वैविधतेचे आकलन व्हावे, म्हणून शासनाने राज्यांतर्गत, आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर युवांचे आदानप्रदान उपक्रम आयोजित करावेत व असे उपक्रम आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व युवा मंडळांना प्रोत्साहित करावे.
- युवा साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने साहित्य-संस्कृती मंडळाच्या योजना आणि कार्यक्रमांचे पुनर्विलोकन करुन त्यांची पुनर्रचना करावी. तसेच शहरी आणि ग्रामीण भागात योजना आणि कार्यक्रमाबाबत जागरुकता आणण्यासाठी साहित्य-संस्कृती मंडळाने प्रयत्न करावेत.
- साहित्य-संस्कृती मंडळाने मराठी बोलीभाषेतील साहित्य प्रकाशित करावे आणि त्याकरिता युवांना प्रोत्साहित करावे.
- युवांनी महाराष्ट्र आणि इतर राज्यातील सांस्कृतिक विविधतेशी एकरुप रहावे व युवांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, यासाठी शासनाने युवा महोत्सव आयोजित करण्यास प्रोत्साहन द्यावे. युवा महोत्सवांच्या निर्णय प्रक्रियेत व आयोजनात युवांचा सक्रीय सहभाग असावा.
- शासनाने तालुकास्तरावर ललित कला केंद्रांची स्थापना करावी. या केंद्रामध्ये युवांसाठी कला दालन, ग्रंथालय आणि सभागृह यांचा समावेश असावा. अशा केंद्राच्या व्यवस्थापन समितीवर युवा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे प्रतिनिधीत्व असावे. उपेक्षित समाजघटकातील युवक-युवतींना ललित कला केंद्रांचा सहजतेने वापर करण्यासाठी विशेष तरतूद करावी.
- युवागट, युवक मंडळे, कृषी व उद्योजकांच्या यशकथा आणि अनुभवांचे आदानप्रदान, युवांशी संबंधित विविध विषयांची माहिती व्हावी, युवांना विविध मुद्दयावर मत स्पष्ट करता यावे, युवांसाठी सृजनशील अभिव्यक्ती व चर्चेचे हक्काचे व्यासपीठ असावे यासाठी ***'युवा महाराष्ट्र'*** हे नियतकालिक सुरु करण्यात यावे. युवा लोकप्रतिनिधी, अधिकारी, तंत्रज्ञांची महत्वाकांक्षा, दृष्टीकोन व योजना जाणून घेण्यासाठी मुलाखती, युवा वैज्ञानिक व संशोधकांची ओळख आदिंचा नियतकालिकात समावेश असावा.
- कम्युनिटी रेडीओ हे संवाद व विचारांचे आदानप्रदान करण्याचे प्रभावी माध्यम म्हणून पुढे येत आहे. स्थानिक युवांना विविधांगी आणि व्यापक स्तरावर समाजासोबत आपले दृष्टीकोन अभिव्यक्त करण्यासाठी व्यासपीठ व रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याची क्षमता या माध्यमात आहे. शासनाने कम्युनिटी रेडीओ संकल्पनेला चालना द्यावी. आणि स्थानिक स्वराज्य संस्था किंवा स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने प्रत्येक तालुक्यात किमान एकतरी कम्युनिटी रेडीओ केंद्र सुरु करावे.
- बहुसांस्कृतिक कार्य वातावरणात काम करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आणि विविध समूहातील एकतेला चालना देण्यासाठी कम्युनिटी रेडीओ केंद्राचे व्यवस्थापन, संपादकीय विभाग, नभोवाणी पत्रकार, रेडीओ जॉकी यासाठी युवांना प्राधान्य दयावे.

- कम्युनिटी रेडीओवरील जाहिरातींचे विद्यमान नियम आर्थिक क्षमतेच्या दृष्टीने कम्युनिटी रेडीओवर मर्यादा आणतात. शासनाने या नियमांचे पुनर्विलोकन करावे. अशा रेडिओ केंद्रांना जाहिरातींव्दारे रास्त दराने निधी संकलनाची मुभा असावी.
- दूरचित्रवाणी हे संप्रेषण व संवादाचे महत्वाचे माध्यम आहे. शासनाने महाराष्ट्रातील युवांसाठी युवा दूरचित्र वाहिनी सुरु करावी. युवा वाहिनीवर चर्चात्मक कार्यक्रमच्या माध्यमातून युवांना त्यांचे दृष्टीकोन व्यक्त करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करुन द्यावे.मनोरंजन आणि माहितीप्रधान कार्यक्रमांमध्ये समतोल असावा. युवा धोरण, योजना, कार्यक्रम आणि शैक्षणिक माहितीचे प्रसारण करण्यासाठी विविध विभागांनी व इतर संस्था व औदयोगिक प्रतिष्ठानांनी या वाहिनीचा उपयोग करावा.
- युवांची सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि संप्रेषणामध्ये पथनाटयाचे अनन्यसाधारण महत्व आहे. पथनाटयांद्वारे अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. औपचारिक शिक्षणात पथनाटयाचा समावेश करावा.
- शालेय शिक्षणामध्ये साहित्य, नाटय, चित्रपट, नृत्य, संगीत आणि दृकश्राव्य अशा कलांद्वारे अभिव्यक्तींचे रसग्रहण करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावी.
- शासनाने शाळा व महाविद्यालयांमधून कला व संस्कृतीबाबत रुची निर्माण होण्याच्या दृष्टीने विद्यार्थी छंदगटांना प्रोत्साहन द्यावे. शैक्षणिक संस्था तसेच आंतरशालेय/ आंतर-महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक गटासाठी नियमित प्रदर्शने आणि स्पर्धा आयोजित कराव्यात.
- शैक्षणिक संस्थांमध्ये कला शिक्षक आणि मूलभूत सोयी सुविधांची उपलब्धता असेल, याची दक्षता घ्यावी व त्यांची किमान मानके असावीत. शिक्षणामध्ये कलेला योग्य स्थान मिळावे म्हणून शिक्षकांच्या नियमित प्रशिक्षणात कला व संस्कृती या दोन घटकांचा समावेश करावा.
- राज्यस्तरावरील कार्यक्रम आणि उपक्रमांमध्ये सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षण गुण (ग्रेस मार्क) देण्याची नियमावली तयार करावी आणि कोणत्याही शिक्षण शाखेत व स्तरावर त्याला प्रवेशासाठी प्राधान्य द्यावे.
- माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणात कला विषय शिकविण्यासाठी सक्षम प्राधिका-यांनी सोयी-सुविधा, अभ्यास साहित्य, वैकल्पिक अभ्यासक्रम तयार करावेत. कला शिक्षण आणि कलात्मक अभिव्यक्ती यामधील दरी कमी करावी.
- महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरणातील शिफारशी व उपाययोजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी.
- राज्यातील कला शिक्षणामध्ये सुसूत्रता व मानके निर्माण व्हावीत त्याचबरोबर राज्यातील कला महाविद्यालये नृत्य, नाटय, व संगीत विभागांचा समन्वय प्रस्थापित व्हावा याकरीता शासनाने ललित आणि उपयोजित कला विद्यापीठाची स्थापना करावी. या विद्यापीठात नाटय, संगीत, नृत्य आणि ललित कला विभाग असावेत. पारंपारिक कला प्रकारांचा स्वतंत्र विभाग या विद्यापीठात असावा.
- युवा कलावंत व अभिव्यक्ती कार्यकर्त्यांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी या विद्यापीठाने ललित कला आणि उपयोजित कलेच्या राज्यस्तरावरील कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन करावे.
- कला आणि संस्कृती विषयात नैपुण्य असलेल्या युवांसाठी या विद्यापीठाने रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात आणि त्यासाठी प्रोत्साहन द्यावे. सांस्कृतिक कार्य

विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग आणि पर्यटन विभागांच्या सहकार्याने विशेष प्रयत्न करावेत.

- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कला व संस्कृतीबाबतच्या माहितीचे दस्तऐवजीकरण आणि प्रसार करण्यात यावा.
- कलांचे प्रकार, परंपरा आणि ऐतिहासिक स्थळांची माहिती, लेख आणि चलचित्रफितींचे डिजिटलायझेशन करण्यात यावे. ही माहिती संगणक प्रणाली व्दारे उपलब्ध होईल, यासाठी युवांच्या प्रयत्नांना शासनाने प्रोत्साहन द्यावे.
- लग्नानंतर युवतींची सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि सामाजिक सहभाग कमी होतो[1], ही वस्तुस्थिती लक्षात घेता विवाहित युवतींना सांस्कृतिक कार्यक्रमांच्या संधी सुलभ व्हाव्यात, यासाठी विशेष कार्यक्रमांची आखणी करुन उपाययोजना करण्यात याव्यात.
- शासनाने आदिवासी आणि कृषी पर्यटनासह सांस्कृतिक पर्यटनाला चालना द्यावी.
- ललित व उपयोजित कला विद्यापीठातून शिक्षण घेणारे आणि युवा महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत असलेल्या युवांना राज्य परिवहन आणि रेल्वे प्रवासामध्ये सवलत उपलब्ध करुन द्यावी.
- युवा महोत्सव, स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कला प्रदर्शनांमध्ये सहभागी होत असलेल्या युवांना सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग यासारख्या शासनाच्या विविध विभागांचे विश्रामगृह शासकीय कर्मचा-यांना आकारण्यात येणा-या दराने उपलब्ध करुन देण्यात यावे.
- कला व संस्कृती हा गट आणि जिल्हास्तरावर नियोजनाचा घटक असला पाहिजे. शासनाने कला आणि संस्कृतीच्या प्रोत्साहनासाठी अंदाजपत्रकीय तरतूद करावी.
- विविध गट आणि समूहांची सांस्कृतिक ओळख जपणे आवश्यक आहे, तथापि घातक सांस्कृतिक प्रथा, उदा. देवदासी आणि शोषणाच्या अन्य प्रकारांचे निर्मूलन करण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. सांस्कृतिक जीवनाच्या मुख्य प्रवाहामधून दुरावलेल्या व्यक्तिंना प्रवाहात सामावून घेण्याबाबत जागृती निर्माण करावी.

**अपंगाकरिता कला व संस्कृती -**


- अपंग युवा कलाकारांना त्यांचे कला गुण अभिव्यक्त करण्याकरिता कला स्पर्धा, अपंग कलाकारांसाठी प्रशिक्षण शिबिरे, महोत्सव आयोजित करावेत, अशा कलाकारांना कला शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहित करावे.
- ग्रामीण व शहरी भागातील अपंग युवा कलाकारांना त्यांच्या कला प्रकारातील तांत्रिक व सैध्दांतिक ज्ञान प्राप्त व्हावे याकरिता प्रशिक्षण प्रबोधिनीची स्थापना करण्यात यावी. प्रशिक्षणाची जबाबदारी अनुभवी स्वयंसेवी संस्थेकडे सोपवावी. अशा कलाकारांसाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देण्यात यावी.
- अपंग युवा कलाकारांसाठी संमेलनाच्या आयोजन व नियोजनात युवांचा पुढाकार असावा. आयोजनाकरिता राज्य शासन, गावातील स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग ७५:१५:१० असा असावा.

[1] नेहरु युवा केंद्राचा अहवाल

“आपल्या देशाची आर्थिक प्रगती तंत्रज्ञानाने होत आहे, हे एक उत्तम लक्षण आहे.”

“ स्वप्न म्हणजे झोपल्यावर बघायची गोष्ट नाही, स्वप्न म्हणजे जे तुम्हाला झोपू देत नाही ते.”

-डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम



## विज्ञान व तंत्रज्ञान



विज्ञान व तंत्रज्ञान हे मानवी विकासाचे महत्वपूर्ण घटक आहेत. मानवाच्या दैनंदिन जीवनावर विज्ञान व तंत्रज्ञानाचा अनुकूल परिणाम होत असून या क्षेत्रातील संशोधन, प्रगती, शास्त्रीय माहितींची ओळख युवांना असणे अत्यंत गरजेचे आहे. युवा हे नवीन माध्यमांची ओळख व त्यातील माहिती घेण्यासाठी उत्सुक व जिज्ञासू असतात. तसेच युवामध्ये नवीन संकल्पना, प्रयोगशिलता आणि शोधवृती असते. यासाठी युवांना प्रोत्साहित करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे महत्वाचे आहे.

| फलश्रुती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • शहरी व ग्रामीण भागातील युवांना कला व विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे<br>• लग्नानंतरही युवतींचे सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागातील सातत्य | • कला व संस्कृतीमधील विविध संशोधनासाठी युवांना शिष्यवृत्ती देणे<br>• जिल्हा, तालुका स्तरावर उत्कृष्ट कलाकेंद्र उभारणे<br>• युवा विचारांच्या आदान - प्रदानासाठी कार्यक्रमाचे आयोजन<br>• कला व संस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी विविध माध्यमांचा उत्तमरित्या वापर करणे |

- विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांमध्ये विशेष कल व गती असणा-या शालेय व शाळाबाहय युवांकरिता प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती, प्रशिक्षण व अन्य सुविधा देण्यात याव्यात. असे युवा शोधण्याकरिता जिल्हा पातळीवर निवड प्रक्रिया असावी.
- विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त युवांना संधी उपलब्ध होण्यासाठी राज्यातील या विषयाशी संबंधित संस्था व महाविद्यालये विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात असावेत.
- विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रामध्ये संशोधन करु इच्छिणाऱ्या युवांना शालांत परीक्षेनंतर पंधरा वर्षाकरिता आर्थिक मदत व संशोधन सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात.
- समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याकरिता युवांसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत जसे की, वैज्ञानिक वाड्.मय व साहित्य निर्मिती, शैक्षणिक सहली, अभ्यासदौरे,विज्ञान प्रदर्शने, कार्यशाळा, वैज्ञानिक खेळ इ.

- ग्रामीण भागातील युवांमध्ये विज्ञान, तंत्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाविषयी विशेष आवड व रुची निर्माण व्हावी यासाठी ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या विज्ञान, तंत्रशिक्षण आणि तंत्रज्ञान महाविद्यालये व संस्थांना विशेष प्रोत्साहन व पाठबळ देण्यात यावे.
- स्वयंसेवी संस्था आणि खाजगी क्षेत्राच्या भागीदारीतून तालुका व जिल्हास्तरावर विज्ञान केंद्र स्थापन करावीत.
- विज्ञान व तंत्रज्ञानाशी निगडीत तांत्रिक साहित्य व उपकरणे युवांना सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात यावेत.
- विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये होणा-या आधुनिक बदलाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम सुरु करावेत व वेळोवेळी अद्यावत करण्यात यावेत. उदा. ऑप्टीकल इंजिनिअरींग,मटेरिअलर्स इंजिनिअरींग, नॅनो टेक्नॉलॉजी, स्पेस इंजिनिअरींग, न्युक्लीअर इंजिनिअरींग, रोबोटिक्स, बायोटेक्नॉलॉजी, बायोइन्फॉरमॅटीक्स, जेनेटीक इंजिनिअरींग, इन्व्हायरमेंटल इंजिनिअरींग, ॲग्रीकल्चर इंजिनिअरींग इ. अशा प्रकारच्या अभ्यासक्रमांसाठी ग्रामीण भागामध्ये विशेष महाविद्यालये सुरु करण्यात यावेत.
- शासकीय क्षेत्रासह सर्व घटकांमध्ये माहिती तंत्रज्ञान वापराचे महत्व ओळखून संगणक प्रशिक्षणात मराठी भाषेचा समान वापर करण्यासाठी विकसित केलेल्या युनिकोड सॉफ्टवेअरच्या वापराची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
- सर्व विद्यापीठे, शासकीय/निमशासकीय संस्थांनी युवांना शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार आणि सामाजिक सुरक्षेसाठी लागणारी प्रमाणपत्रे आणि औपचारिक कागदपत्रांचा डिजिटल स्वरुपात डाटाबेस तयार करुन त्याचा सहज व सार्वत्रिकपणे वापर करण्यात यावा. तसेच संगणक साक्षरता, इंटरनेट सेवेची उपलब्धता यावर भर द्यावा आणि त्याचा प्रचार व प्रसार करावा.
- ग्रामीण व दुर्गम भागातील युवांना संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळण्यासाठी प्रशिक्षण देणा-या संस्थांना प्रोत्साहन दयावे.
- विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रात पारंगत असणाऱ्या युवांना ओळखण्यासाठी तांत्रिक प्रणाली विकसित करावी.



**"आपण सर्वांनी आधी भारतीय, नंतर भारतीय आणि शेवटीही भारतीयच असले पाहीजे."**
**. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**



## नागरिकत्व

युवा वर्ग हा समाजाचा महत्वाचा घटक असल्याने राज्याच्या विकास प्रक्रियेत युवांचा महत्वपूर्ण व सक्रीय सहभाग असणे आवश्यक आहे. कौशल्य, क्षमता आणि नेतृत्व गुण विकसित करणाऱ्या कार्यक्रमांच्या निर्णय प्रक्रिया व अंमलबजावणीमध्ये त्यांचा सहभाग असावा, जेणेकरुन युवांना जबाबदार नागरिक म्हणून घडविण्यास मदत होईल.

- विद्यार्थी व विद्यार्थेतर युवांनी समाज उभारणीच्या प्रक्रियेत स्वयंस्फूर्तीने योगदान द्यावे याकरिता प्रोत्साहनपर 'सामाजिक गुणांकन' (सोशल क्रेडिट) ची व्यवस्था करावी. याकरिता सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मानके निश्चित करुन त्याआधारे उच्च शिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार यासंबंधीच्या योजनांमध्ये युवांना प्राधान्य देण्यात यावे.
- सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि सर्वप्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये युवांसाठी एक तृतीयांश प्रतिनिधीत्व उपलब्ध करुन द्यावे.
- राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक संस्थांचे नियमन करणाऱ्या सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व कायद्यांचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करावी आणि या संस्थांच्या प्रशासन व व्यवस्थापन रचनेत युवांच्या सक्रिय भूमिकेला वाव देणा-या शक्यता पडताळून शिफारशी कराव्यात.
- नागरिकत्व उपक्रमांद्वारे युवांमध्ये स्वयंसेवी वृत्तीला चालना, लोकशाही मूल्यांचा स्वीकार करण्याची समज आणि जाणीव विकसित करावी. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीरे, विशेष शिबीरे, स्वयंसेवी संस्था आणि नागरी संस्थांद्वारे आयोजित जागृती उपक्रम आदींना प्रोत्साहन द्यावे.
- युवांच्या नेतृत्व गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालय आणि विद्यापीठस्तरावर लोकशाही प्रक्रियेद्वारे खुल्या व निपक्षपाती वातावरणात निवडणूका घेण्यात याव्यात.
- सार्वजनिक कामाच्या गुणवत्ता नियंत्रणात स्थानिक रहिवाशी युवांना सहभागी करुन घ्यावे. उदा. खेळांची मैदाने, सार्वजनिक उद्याने, सामुदायिक जागा, कचरा व्यवस्थापन व पाणी पुरवठा आदी पायाभूत सार्वजनिक बाबींच्या व्यवस्थापनात युवांचा सक्रीय सहभाग असावा. आपत्ती व्यवस्थापनात युवांना सहभागी करुन घेण्याकरिता त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे.
- संशोधन, सामाजिक कृती कार्यक्रम आणि प्रयोगाधारित अध्ययन करणा-या युवांना अभ्यास शिष्यवृत्ती (फेलोशिप) देण्यात यावी.
- पालक, शिक्षक व मोठ्या व्यक्तींबद्‌दलचा आदर तसेच गरिब-गरजूंबद्दलची सहानुभूती ही मूल्ये युवांमध्ये विकसीत करण्यावर भर द्यावा आणि भारतीय संस्कृतीमधील कुटुंब ही मुलभूत संपत्ती असून ती संकल्पना युवांच्या मनावर बिंबवावी.
- भ्रष्टाचारविरोधी कार्य करण्यासाठी युवांना प्रेरणा द्यावी व भ्रष्टाचार विरोधी समित्यांमध्ये त्यांचा अंतर्भाव करावा.
- देशातील लोकशाही मूल्ये व निवडणूक प्रणाली याबाबतची माहिती युवांना द्यावी.
- समता, स्वातंत्र, न्याय बंधुता व राष्ट्रीय एकात्मता याबाबात युवांमध्ये जागृति करणे.

## सामाजिक सुरक्षा

सामाजिक सुरक्षा ही मानवी अधिकारातील महत्वपूर्ण बाब आहे. भयमुक्त जगणे व उपजिवीकेची पुरेशी साधने उपलब्ध असणे हा मानवाचा अधिकार आहे. राज्याचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी युवांच्या सर्वांगिण विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रवाहापासून दुरावलेल्या घटकांना सामाजिक सुरक्षा देण्याबाबत शासन प्रयत्नशील असले तरी युवांच्या भावी आयुष्याच्या जडणघडणीसाठी योग्य मार्गदर्शन, दिशा व पुरेशी संधी

उपलब्ध करुन दिल्यास असंघटित क्षेत्रात काम करणा-या युवा गुणवत्तेचा राज्याच्या विकासासाठी पुरेपुर लाभ घेता येईल. यासाठी सामाजिक सुरक्षा आवश्यक आहे.

- युवांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी पारंपारिक व्यवसायांचे संरक्षण व कालानुरुप पुनरुज्जीवन करण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी.
- नैसर्गिक आपत्ती, स्थलांतर, अचानक उद्‌भवणारी आपत्ती यामुळे प्रभावित होणा-या युवांना शिक्षण, निवारा व उपजिवीकेची साधने तातडीने उपलब्ध करावीत.
- खाजगी व सार्वजनिक ठिकाणी कार्यरत असणा-या युवांचे शारीरिक व मानसिक शोषण होणार नाही याकडे पुरेसे लक्ष देण्यात यावे.
- संघटित असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या युवांना सुरक्षिततेच्या दृष्टीने मूलभूत सुविधा उपलब्ध असाव्यात.
- उपजिवीका, शिक्षण व व्यवसाय यासाठी युवांच्या स्थलांतराचे स्वरुप लक्षात घेऊन त्याप्रमाणात आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात.
- कायदयाच्या कचाटयात सापडलेले युवा, युवा गुन्हेगार, निराधार युवा, मानवी तस्करीने पिडित युवा व पिडितांची मुले, दुष्काळग्रस्त, अतिशय दुर्गम भागातील आदिवासी व नक्षलवादग्रस्त युवांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी आणि सामाजिक प्रवाहात सामावून घेण्यासाठी कार्यक्रमाची आखणी व विशेष उपाययोजना करण्यात यावी.
- असंघटित क्षेत्रात काम करणा-या युवांच्या सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने भविष्यनिर्वाह निधी, प्रसूती रजा, अपघात नुकसान भरपाई, साप्ताहिक सुट्टी, कामाचे निर्धारित तास इत्यादी सुविधा कायदयाच्या कक्षेत आणणे बाबत विचार व्हावा.
- व्यवसाय, शिक्षण व रोजगार इ. कारणास्तव स्थलांतरित होणा-या युवांना तात्पुरत्या स्वरुपात निवास व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी युवा वसतिगृहे स्थापन करण्यात यावी.
- विधवा, परितक्ता ,विशेष काळजी आवश्यकता असणाऱ्या फसविल्या गेलेल्या अनिच्छेने देह विक्रेय करणाऱ्या युवा महीलांचे योग्य पुर्नवसन व्हावे.
- राष्ट्रीय छात्र सेना,महाराष्ट्र छात्र सेना व स्काउट गाईड इ.व्दारे सुमारे १५ लक्ष विद्यार्थी/युवांना शिस्तबध्द नागरीक घडविण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे त्यांचे प्रशिक्षणासाठी जिल्हास्तरावर प्रशिक्षण केंद्र/भवन उभारण्यात यावीत.



## पौंगंडावस्था/किशोरावस्था

१३ ते १९ वर्ष वयोगटातील हा मोठा घटक आजही विशेष लक्ष देण्याच्या प्रतिक्षेत आहे. मानवी विकासातील एक अत्यंत संवेदनशील वय म्हणजे पौंगंडावस्था होय. या कालावधीत त्यांच्या वैयक्तिक विकासासाठी संवेदनशील, रचनात्मक व सहकार्यात्मक सामाजिक सुरक्षा कवच मिळणे गरजेचे आहे, अन्यथा या वयोगटात झालेल्या प्रतिकूल संस्कारांचा परिणाम व्यक्तीच्या पुढील वर्तन व जडणघडणीवर होतो. या वयोगटातील मुलींमध्ये शारीरिक बदल व परिणामतः उद्‌भवणारे ॲनिमियासारखे रोग यावर वेळीच लक्ष पुरविणे आवश्यक आहे. या वयोगटाच्या विकासासाठी खालील क्षेत्रांवर प्रामुख्याने भर द्यावा लागेल.

| फलश्रुती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • या वयोगटाच्या विकासासाठी खालील क्षेत्रांवर प्रामुख्याने भर द्यावा लागेल.<br>• लग्नातील पुरुष व स्त्री यांचे वयात कमीत कमी फरक<br>• पौगंडावस्थेतील अशिक्षित मुंलींची संख्या घटविणे<br>• मुलींमधील ॲनिमियाचे प्रमाण कमी करणे<br>• आरोग्यदायी पुनरुत्पादन पध्दतीची माहिती सर्वांना सुलभपणे उपलब्ध करण्यावर भर<br>• महिला व पौगंडावस्थेतील मुलींवरील लिंगमूलक अत्याचार/गुन्हयांमध्ये घट करणे. | • पौगंडावस्थेतील मुलींचे शारीरिक आरोग्य विकसित करणे. मुलींचे शारीरिक आरोग्य विकसित करताना त्यांच्यातील ॲनिमियाचे प्रमाण कमी करणे |

या वयोगटातील अतिसंवेदनशील मुले व मुली यांच्यासाठी तितक्याच हळूवारपणे विविध उपाययोजना केल्या तर त्यांचा संतुलित विकास साधता येईल. त्यासाठी खालील शिफारसी आहेत.

- खेळ, मनोरंजन, कला व सांस्कृतिक अभिव्यक्तीचे प्रकटन याद्वारे शारीरिक, मानसिक व भावनिक विकासाला चालना देणे.
- या वयोगटातील मुलांविरुध्द होणारा हिंसाचार तसेच त्यांच्या आत्महत्या थोपविण्यासाठी धोरणे आखून योजना राबविणे.
- या वयोगटातील मुलांच्या पालकांचे प्रबोधन करणे. उच्चतम कुटुंबमूल्यांचा पुरस्कार कुटुंब, समाज व शैक्षणिक संस्थांमध्ये करणे.
- व्यसनाधिन काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या युवांसाठी निवासी सुधार गृहे /विशेष सुविधा गृहे असणे आवश्यक आहे.
- अल्पवयीन विवाहाचे प्रमाण जास्त असणा-या भागामध्ये साक्षरता, शिक्षण व आर्थिक संधी या विविध मुद्दयांवर एकत्रित काम करुन बदल घडविणे तसेच बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.
- या वयोगटातील मुलांचे वैयक्तिक आरोग्य हा शालेय अभ्यासक्रमाचा भाग ठेवणे.
- प्रसार माध्यमातील विकृत चित्रणाला हा वयोगट बळी पडू नये या हेतूने प्रसार माध्यमांसोबत संवाद साधणे तसेच याबाबत संघटीत व असंघटीत क्षेत्रातील प्रसारमाध्यमांच्या चांगल्या कामगिरीला चालना देणे.
- जीवनकौशल्य शिक्षण आणि विविध आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासाठी किशोरावस्थेतील मुलींचे गट तयार करणे, त्यांना ‘किशोरी शक्ती योजना’ या योजनेचा लाभ देणे.
- बालमजुरी प्रतिबंधक विषयक कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे.
- देशाच्या युवा शक्तीच्या उर्जेची बीजे किशोरावस्थेतील वर्तनात दडलेली असतात, या भूमिकेतून किशोरावस्थेतील मुले व मुली यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देणे.

## युवा सामाजिक प्रतिष्ठा निर्देशांक (सोशल क्रेडिट)

जागतिकीकरणामुळे आपल्या देशात एकीकडे देशातंर्गत स्थूल उत्पन्नात वाढ, व्यावसायिक शिक्षणाच्या वाढत्या संधी, साक्षरता व आंतरराष्ट्रीय शिक्षणातील सहभाग वाढत असतानाच दुसरीकडे दारीद्रयरेषेखालील लोकसंख्या, शहराकडे होणारे स्थलांतरण, विद्यार्थीच्या आत्महत्या यातसुध्दा वाढ होत आहे. परिणामतः एकंदरीतच युवांची शिक्षणातील रुची, सामाजिक बांधिलकेची जाणीव कमी होत असल्याची वस्तुस्थिती आहे. या सध्या किमान स्तरावर वाटणाऱ्या समस्यांना आताच प्रभावी उत्तरे शोधली नाहीत तर भविष्यात या समस्या जटील होऊ शकतात. या समस्यांच्या मूळाशी जाता असे दिसून येते की,

दिवसेंदिवस निरपेक्ष सामाजिक कार्याला मिळणारी प्रतिष्ठा खालावत आहे. सामाजिक कार्याला प्रतिष्ठा देऊन युवकांमधील उर्जेचा वापर राष्ट्र उभारणीसाठी करणे शक्य आहे. आजच्या युवांकडे सुप्तज्ञान क्षमता, आत्मविश्वास, भविष्याबाबत सकारात्मक दृष्टी, भावनिक आदर या गोष्टी आहेत. युवांना सकारात्मक कामात सातत्याने मग्न ठेवल्यास त्यांच्याकडून, उत्कृष्ट शिक्षण घेतानाच व्यवसायवृध्दी होऊ शकते. नेतृत्व करण्याची आवड निसर्गतः युवांना असते. सदर आवडीला समाजाकडून योग्य प्रतिसाद मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे युवांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचे मूल्यमापन करुन त्यासाठी निर्देशांक निश्चित करण्याची गरज आहे. याप्रकारे सामाजिक प्रतिष्ठा निर्देशांक निश्चित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरेल असा समितीला विश्वास आहे.

| फलश्रुती | ध्येयपूर्ती प्राधान्य |
|---|---|
| • युवांचा सहभाग सामाजिक कार्यात वाढविणे.<br>• युवांना समाज हिताच्या काम करण्यासाठी प्रेरणा देणे. | • युवांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल त्यांना प्रतिष्ठा देणे |

- युवक मंडळे, महिला मंडळे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे, औद्योगिक प्रतिष्ठाने, उद्योगसमुह यांचेशी संलग्नित युवांना समाजहीताच्या प्राधान्य बाबीची ओळख करुन देण्यात यावी. प्रचार व प्रसार, चर्चासत्र, परिसंवाद इ. माध्यमातून युवांशी संवाद साधला जावा. युवांनी केलेल्या कार्याच्या नोंदी संगणीकृत करण्यासाठी संकेतस्थळावर युवांना स्वतःची माहिती देण्याची संधी उपलब्ध करावी.
- युवांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन शिक्षणात प्रवेश, शैक्षणिक कर्जात प्राधान्य, नोकरींच्या मुलाखती दरम्यान दखल, सामाजिक प्रतिष्ठादर्शक सवलती (शासकीय समारंभात निमंत्रणे, पुरस्कारात विचार) इ. देण्यात याव्यात
- यासाठी युवांनी केलेल्या सामाजिक कार्याचे मूल्यांकन करणे व त्यासाठीची मानके निश्चित करण्यासाठी तज्ज्ञांची त्रिस्तरीय समिती नियुक्त करण्यात यावी.

## युवा वसतिगृह स्थापना व युवा पुरस्कार




- **युवा वसतिगृह** - युवांना नोकरी, व्यवसाय, शिक्षण, मुलाखती, मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी वेळोवेळी शहरांमध्ये जावे लागते. अशावेळी त्यांना त्यांच्या निवासासाठी हक्काचे असे ठिकाण असणे अत्यावश्यक आहे. युवा धोरणामध्ये जिल्हा युवा केंद्रांची गरज ठळकपणे मांडण्यात आलेली आहे, युवांना विविध उपक्रमामध्ये सहभागी होत असताना निवास ही समस्या न राहता त्यांना युवा वसतिगृहे आधार देणारे ठिकाण वाटले पाहीजे. प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी युवा वसतिगृहाची स्थापना करण्यात यावी. या वसतिगृहाचे दर हे वसतिगृहाचे व्यवस्थापन योग्य दर्जाने होण्याइतपत असावेत. वसतिगृहामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव असाव्यात.राज्यात दोन ठिकाणी आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय दर्जाचे वसतिगृह असावे, यामध्ये देशी, विदेशी, पर्यटक, युवक आकर्षिले जातील अशा सोयी सुविधा असाव्यात. प्राधान्याने विभाग व जिल्हा स्तरावरील संकुले तसेच भाडयाने इमारती मध्ये युवा वसतिगृहे

सुरु करावीत. व्यवस्थापन,फर्निचर तसचे आवश्यक सुविधा विकसित करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

- **युवा पुरस्कार** -
  महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्याअंतर्गत दरवर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या युवांना राज्य युवा पुरस्कार दिला जावा. युवांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांचा गौरव करणे आवश्यक आहे. यातून युवक-युवतींना प्रेरणा मिळेल. जिल्हा स्तरावर प्रत्येकी एक युवक व एक युवती तसेच एक संस्था यांना प्रतिवर्षी हा पुरस्कार देण्यात यावा. तर राज्यस्तरावर आठ युवक/ युवती तसेच आठ संस्था यांना प्रतिवर्षी हा पुरस्कार देण्यात यावा. जिल्हा व राज्यस्तरीय वैयक्तिक पुरस्काराचे स्वरुप अनुक्रमे रोख रु. १०,०००/- व रु. ५०,०००/- तसेच सन्मानपत्र व मानचिन्ह अशा स्वरुपाचे असावे. जिल्हा व राज्यस्तरीय संस्थांना रोख पुरस्कार अनुक्रमे रू. ५०,०००/- व रू. १.०० लाख व सन्मानचिन्ह असे असावे. या पुरस्कारार्थीना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्यांप्रमाणेच सर्व सुविधा देण्यात याव्यात. प्रतिवर्षी राज्य युवा महोत्सवामध्ये हे पुरस्कार समारंभपूर्वक देण्यात यावेत.
- **जे.म.लिंगडोह समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी** - विद्यार्थ्यांची भूमिका व त्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे. जे.म.लिंगडोह समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी राज्यात करण्यात यावी.



**" तुमचे यश महत्वाचे निर्णय घेण्यात नसते ,तर महत्वाचे निर्णय अंमलात आणण्यात असते."**
**- छत्रपती शिवाजी महाराज**

## अंमलबजावणी यंत्रणा व नियमन

- युवा धोरणाच्या उद्दिष्टांची व्यापकता लक्षात घेऊन राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांनी अनुषंगिक योजना/कार्यक्रम कार्यान्वित करणे अपेक्षित आहे. धोरणाच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी कार्यान्वित योजनांचे पुनर्विलोकन, एकत्रिकरण, आवश्यक सुधारणा, नवीन योजनांची आखणी व अंमलबजाणी करणे आवश्यक आहे. धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणी व फलश्रृतीसाठी राज्यस्तरावर समन्वय यंत्रणा असणे आवश्यक आहे. युवा विकासाच्या प्रचलित योजनांचा तत्परतेने आढावा घेवून कालानुरुप आवश्यक सुधारणा करुन अंमलबजावणी करण्यात यावी.
- युवांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी सकारात्मक विचार करुन युवांचा पुरेसा सहभाग व लाभ होईल अशा उपक्रमाचे नियोजन व कार्यान्वयन करण्यात यावे.
- शासनाच्या युवा संबंधित योजनांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवणे, युवांच्या प्रश्नाबाबत अभ्यास, संशोधन, विश्लेषण तसेच युवांच्या समस्यांचे निराकरण करणे, आढावा व मूल्यमापन करणे तसेच धोरणाच्या उद्दिष्ट पूर्ततेच्यादृष्टीने कार्यान्वित उपक्रम, योजनांची

प्रभावी अंमलबजावणी व नियमन करण्यासाठी राज्य युवा आयोगाची स्थापना करण्यात यावी.

- युवा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात 'युवा अर्थसंकल्प' स्वतंत्र असावा.
- युवा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता केंद्रशासनाच्या धर्तीवर राज्यशासनाने 'युवा विकास' व 'क्रीडा' असे दोन स्वतंत्र विभाग स्थापन करावेत.
- क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या विविध उपक्रमामध्ये समन्वय साधण्यासाठी व प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्हयात 'जिल्हा युवा विकास केंद्र' स्थापन करण्यात यावे. या केंद्रांनी गाव/प्रभाग स्तरावर युवा मंडळ, युवा सहकारी संस्था, युवा गटांना प्रोत्साहित करुन युवा विकासाच्या विविध उपक्रमांमध्ये समाविष्ट करुन घ्यावे.
- युवांच्या सर्वांगिण विकासासाठी उपयुक्त विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सहाय्यभूत निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने 'राज्य युवा विकास निधी' ची स्थापना करण्यात यावी. व्यक्ति, खाजगी प्रतिष्ठाने, स्वयंसेवी संस्था यांनी देणगी स्वरुपात दिलेल्या निधीस आयकरात सूट देण्यात यावी.

**मूल्यमापन**

- या धोरणाअंतर्गत घेतल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांचे संनियंत्रण व मूल्यमापन हे साध्य आधारित (outcome based) असावे. सर्व संबंधित घटकांनी दाखल केलेल्या मासिक अहवालांचे विश्लेषण करुन या धोरणाअंतर्गतच्या उपक्रमाचे व्दिवार्षिक संनियंत्रण व मूल्यमापन करण्यात यावे. धोरणांतर्गत कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व आवश्यक सुविधांची उपलब्धता करुन अपेक्षित परिणाम साधणे हा या संनियंत्रणामागचा मुख्य हेतू असावा. या संनियंत्रण प्रक्रियेत युवा आयोगाची महत्वाची भूमिका असावी.
- युवा धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांच्या संनियंत्रणासाठी विधानसभा व विधानपरिषदेच्या युवा सदस्यांची स्थायी समिती स्थापन करण्यात यावी.
- धोरणातील घटकांच्या उद्दिष्टांची पूर्तता व परिणामकारकता यांची पडताळणी करण्यासाठी दर तीन वर्षांनी निर्देशांक आधारित मूल्यमापन करण्यात यावे.
- दर तीन वर्षांनी युवा विकास निर्देशांक व युवा विकास अहवाल प्रकाशित करण्यात यावा.

## युवा धोरणाचा कालावधी व आढावा

राज्याच्या युवा धोरणाचा कालावधी धोरण जाहीर झाल्यापासून पुढील दहा वर्षांकरिता निश्चित करण्यात येत आहे. धोरणात नमूद केलेल्या विविध उद्दिष्टपूर्तीबाबतचा मध्यावधी आढावा घेण्यासाठी पाच वर्षांनी आढावा समिती नियुक्त करण्यात यावी.

## —: वित्तीय व्यवस्था :—

राज्याच्या लोकसंख्येचा मोठा घटक असणा-या युवा वर्गाचा सर्वंकष विकास हा देशाची प्रगतीशी निगडीत आहे. त्यासाठी मनुष्यबळ विकासावर होणारा शासनाचा खर्च हा खर्च न मानता ती मानवी संसाधन विकासासाठी अत्यावश्यक असणारी गुंतवणूक मानण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाचे युवा धोरण २०१२ अंतर्गत घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. राज्याचे क्रीडा व युवककल्याण उपक्रमांसाठी एकत्रित अर्थसंकल्पिय तरतूद केली जाते. १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२-२०१७) अंदाजित रु.१४३४.७१ कोटी इतका निधि क्रीडा व युवककल्याण अंतर्गत उपलब्ध होणार आहे. या धोरणात नमूद विविध बाबींची कार्यवाही होण्यासाठी प्रचलित योजनांमध्ये सुधारणा करतानाच काही नवीन योजना लागू करण्यात येतील. प्रस्तावित योजनांचा तपशिल परिशिष्ट-ब मध्ये देण्यात आला आहे.

## राज्याचे युवा धोरण ठरविण्यासाठी गठीत केलेली समिती

(शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीआ-२१०७/प्रक्र.१७७/०७/क्रीयुसे-२, दि.२० फेब्रुवारी, २०१०)

| अ.क्र | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.ना.श्री.पद्‌माकर वळवी, मंत्री (क्रीडा व युवक कल्याण.) | अध्यक्ष |
| २ | मा.ना.श्री.भास्करराव जाधव,राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण.) | उपाध्यक्ष |
| ३ | मा.श्री.संजय कुमार,प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग. | सदस्य सचिव |
| ४ | श्री.नरेंद्र सोपल,संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य सह सचिव |
| ५ | श्री. देवेंद्र फडणवीस, विधानसभा सदस्य, नागपुर | सदस्य |
| ६ | श्री. जितेंद्र आव्हाड,विधानसभा सदस्य, ठाणे | सदस्य |
| ७ | श्री.अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर | सदस्य |
| ८ | श्रीमती. प्रणिती सुशीलकुमार शिंदे, विधानसभा सदस्य,सोलापूर | सदस्य |
| ९ | श्री.दिपक केसरकर,विधानसभा सदस्य, सावंतवाडी, जि.सिंधूदूर्ग | सदस्य |
| १० | श्री.नितीन विजयकुमार सरदेसाई, विधानसभा सदस्य,माहिम, मुंबई | सदस्य |
| ११ | श्रीमती अनिला पिल्लाई, उपप्राचार्य, एच.आर महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई | सदस्य |
| १२ | डॉ.व्यंकटेश कुमार, मुंबई विद्यापीठ | सदस्य |
| १३ | श्री.हितेंद्र सोमाणी, पुणे (राष्ट्रीय युवा पारितोषिक विजेते) | सदस्य |
| १४ | श्री.बाळकृष्ण चतुर्भुज (बी.सी.) भारतीया, नागपूर | सदस्य |
| १५ | श्री.अतुल कुलकर्णी, ब्युरो चीफ, लोकमत, मुंबई. | सदस्य |
| १६ | श्री.रविकिरण रावसाहेब देशमुख, वरिष्ठ वार्ताहर, मुंबई मिरर | सदस्य |
| १७ | श्री.सोमेश्वर संभाजी बालगुडे, पुणे | सदस्य |
| १८ | श्री.कैलास उत्तमराव मगर,हिंगोली | सदस्य |
| १९ | श्री.आशिष दिनेश कुलकर्णी, वरळी, मुंबई | सदस्य |
| २० | श्री.पोपटराव पवार, हिवरेबाजार, ता.जि. अहमदनगर | सदस्य |
| २१ | श्री.राजदीप सरदेसाई, वरिष्ठ पत्रकार, एन.डी.टी.व्ही. | सदस्य |
| २२ | श्री.नितीन वैद्य, झी, नेटवर्क | सदस्य |
| २३ | डॉ.दिगंत प्रकाश आमटे, गडचिरोली | सदस्य |
| २४ | श्री.सचिन माधवराव सावंत, मुंबई उपनगर | सदस्य |
| २५ | श्री.दत्ता बाळसराफ | सदस्य |
| २६ | श्री.नीलेश पुराडकर | सदस्य |
| २७ | श्री.विश्वास ठाकूर, नाशिक | सदस्य |
| २८ | श्री.निलेश राऊत, औरंगाबाद | सदस्य |
| २९ | श्री.मॅथ्यू मट्टम, पुणे | सदस्य |
| | *विशेष निमंत्रित सदस्य* | |
| १ | श्री मिलिंद देवरा, लोकसभा सदस्य, मुंबई | |
| २ | श्रीमती सुप्रिया सुळे, लोकसभा सदस्य, बारामती | |

| उपसमितींच्या अध्यक्षांची नांवे | | |
|---|---|---|
| अ.क्र | नाव | उपसमितीचे नाव |
| १ | श्रीमती प्रणिती सुशीलकुमार शिंदे विधान सभा सदस्य | आरोग्य, पर्यावरण, सामाजिक क्षेत्र |
| २ | श्री देवेंद्र फडणवीस, विधान सभा सदस्य | व्यवसाय प्रशिक्षण, रोजगार, शिक्षण, ग्रामीण विभाग विकास परिषद नियमावली कार्यान्वयीन यंत्रणा |
| ३ | डॉ.व्यंकटेश कुमार, मुंबई | विज्ञान व तंत्रज्ञान |

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री विश्वास ठाकूर, नाशिक | कला व सांस्कृतिक |
| ५ | श्री.अशिष कुलकर्णी,मुंबई | आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक कल्याण, कृती आराखडा |

| **विशेष सहाय्य** | |
|---|---|
| मा डॉ भालचंद्र मुणगेकर, खासदार | डॉ राजन मा.वेळूकर, कुलगुरु,मुंबई विद्यापीठ |
| श्री निलेश पारवेकर, विधान सभा सदस्य | श्री रवी राणा, विधान सभा सदस्य |
| श्री महेश पाठक,<br>सचिव,उच्च व तंत्र शिक्षण,महाराष्ट्र शासन | श्री विवेक सावंत,<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>एम.के.सी.एल.पुणे |
| डॉ.सुधीर गव्हाने , माजी कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक | श्री शिवानंद हुल्याळकर, पुणे |
| श्री सुनिल जी कर्वे, सदस्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक | डॉ फादर फ्रांन्सीस स्वामी, प्राचार्य, होली फॅमिली हायस्कुल |
| श्रीमती सीमा उकार्डे,उपसचिव, क्रीडा विभाग | श्री.सतिश जोधळे अवर सचिव,क्रीडा विभाग |
| श्रीमती ग्रेसी पिंटो, झेविअर्स स्कुल | श्री एम एच चैनी, मुंबई |
| डॉ एस के महाजन, | श्री सुरेश म्हात्रे , टाटा कन्सल्टंट सर्व्हिस लि.मुंबई |
| श्री सिध्दार्थ प्रकाश,मुंबई | डॉ मुनीर गाझी,मुंबई |
| श्री. वैनतेय पिंगळे,मुबई | श्रीमती वर्षा माळवतकर |
| डॉ आनंद बंग, गडचिरोली | श्री.विजय तापस ,मुंबई |
| डॉ. सचिन जाधव | प्रा.अनिल वानखेडे, |
| श्री. कुणाल दलाल | श्री.संदेश सिंगारकर |
| श्री संजय दुधे, नागपूर | डॉ जितेंद्र दहाडे |
| श्री सुरेश पाटील, मुंबई | प्रा लता नारायण |
| श्री.कौस्तुभ देवळे | डॉ अमित नागरे |
| श्री.महेंद्र रोकडे | श्री अभिजीत खानविलकर |
| श्री.माणिक ठोसरे,<br>उपसंचालक क्रीडा व युवक सेवा | श्रीमती पी.एन.गड्मवार,<br>सहाय्यक संचालक,क्रीडा व युवक सेवा, |
| श्री.सुहास पाटील,<br>सहाय्यक संचालक,क्रीडा व युवक सेवा, | |

(परिशिष्ट-ब)

## :: महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण ::

## प्रस्तावित योजना

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरच्या ५० वर्षांच्या काळात वेळोवेळी युवक कल्याणाच्या विविध योजना आखून त्याची अंमलबजावणी झाली आहे. या योजनांचा राज्याच्या युवा कल्याणात निश्चितच वाटा होता. आता ५० वर्षानंतर यामध्ये आलेल्या समस्यांवर प्रभाविरितीने कायमची मात करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या हेतूने या धोरणात घटकनिहाय विविध शिफारशी सुचविल्या आहेत. या शिफारशींची अंमलबजावणी संबंधित विभागाने पूर्ण क्षमतेने करणे, यातच धोरणाचे यश सामावलेले आहे.

| अ.क्र. | योजनेचा तपशिल | अंमलबजावणी विभाग | सहाय्यक विभाग |
|---|---|---|---|
| १. | **युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना :-**<br>युवांच्या सर्वांगिण विकासासाठी कार्य करणारे केंद्र राज्यात स्थापन करुन त्या केंद्रामधून युवांच्या प्रगतीसाठीच्या विविध योजना राबविणेत येणार आहेत. राज्यस्तरीय युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना दोन ठिकाणी (प्रादेशिक समतोल व स्थानिक सुविधा विचारात घेऊन) करण्यात येईल. या केंद्रांचे स्वरुप यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी (यशदा) यांच्याप्रमाणे स्वायत्त संस्था म्हणून असेल. या केंद्राच्या निर्मितीसाठी भांडवली खर्च व आवर्ती खर्चाची तरतूद सर्वप्राथम्याने करण्यात येईल. यामध्ये व्यवस्थापनासाठी युवक केंद्र व्यवस्थापक, कार्यक्रम समन्वयक, लिपिक, शिपाई असे प्रत्येक केंद्रात मनुष्यबळ असेल. याठिकाणी ई-ग्रंथालय असेल, यामधून खालील कार्यक्रम हाती घेण्यात येतील.<br>१. अद्ययावत विज्ञान तंत्रज्ञानाची ओळख, उजळणी अभ्यासक्रम.<br>२. सामाजिक उत्तरदायित्वाबाबत युवांचे प्रबोधन.<br>३. आधुनिक जीवनशैली व वाढत्या स्पर्धेमुळे येणारे मानसिक ताण-तणाव, वैफल्य, नैराश्य याबाबत समुपदेशन.<br>४. सामाजिक आरोग्याबाबत जागृती व त्याद्वारे वैयक्तिक आरोग्याची जपवणूक.<br>५. सामाजिक विकास योजनांची तोंडओळख व युवक नेतृत्व प्रशिक्षण.<br>६. जागतिक नवनवीन रोजगार क्षेत्र व सेवा उद्योगातील संधी.<br>७. शाश्वत विकास (वन्य जीव संरक्षण, पर्यावरण, जलसंधारण) इ.<br>८. क्रीडा, कला व संस्कृतीमधील जागतिक बदलांचा मागोवा.<br>९. स्पर्धा परीक्षांबाबतचे मार्गदर्शन - केंद्रशासकीय सेवेमध्ये निवड होण्यासाठी राज्यात सध्या तीन शासकीय मार्गदर्शन केंद्रे कार्यरत आहेत. त्यातून संघ लोकसेवा | क्रीडा व युवक सेवा संचालनालय, | वित्त व नियोजन, रोजगार व स्वयंरोजगार , उच्च व तंत्र शिक्षण, आरोग्य,माहिती जनसंपर्क , पर्यटन विभाग , युवक मंडळे,महिला मंडळे, |

| अ.क्र. | योजनेचा तपशिल | अंमलबजावणी विभाग | सहाय्यक विभाग |
|---|---|---|---|
| | आयोगाच्या स्पर्धा परीक्षांसाठी प्रामुख्याने मार्गदर्शन केले जाते. केंद्रीय सनदी सेवेमध्ये राज्यातील युवकांची संख्या वाढविण्यासाठी अधिक केंद्रांची गरज आहे. त्यामुळे राज्यस्तरीय युवा केंद्रामध्ये याबाबत स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येईल. त्यांना सध्या कार्यरत तीन शासकीय मार्गदर्शन केंद्राप्रमाणे सर्व सुविधा पुरविण्यात येतील.<br>१०. राज्यस्तरीय युवा केंद्रांच्या ठिकाणाहून युवांना प्रेरणादायी ठरेल असे ''युवा महाराष्ट्र '' मासिक प्रकाशन करण्यात येईल. त्यामधून सदर केंद्राच्या कार्यक्षेत्रातील विविध युवा घडामोडींचा मागोवा घेण्यात येईल.<br>११. व्यक्तिमत्व विकास, चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद.<br>१२. प्रचलित युवा हितांच्या योजनांचा प्रचार, प्रसार करतानाच कालसुसंगत सुधारणा सुचविण्यात येतील. | | |
| २. | **जिल्हास्तरीय स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र :-**<br>केंद्रशासनाच्या सेवेतील प्रवेशासाठी विविध यंत्रणा, स्पर्धा परीक्षा आयोजित करतात. (स्टाफ सिलेक्शन कमिशन, बँक रिक्रुटमेंट बोर्ड, रेल्वे भरती बोर्ड, विमा प्राधिकरण इ.) या सेवांमध्ये महाराष्ट्रातील युवकांचा सहभाग वाढावा तसेच राज्यसेवेत योग्य दर्जा व गुणवत्तेचे उमेदवार प्रवेशित व्हावेत या हेतूने प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात येईल. यासाठी निवड चाचणीद्वारे लाभार्थी निवडणे, त्यांना ग्रंथालय, इंटरनेट, निवडक प्रशिक्षणवर्ग, मुलाखत पूर्वप्रशिक्षण इ.सुविधा मोफत देण्यात येतील. याशिवाय केंद्रबाह्य युवकांना ग्रंथालय सुविधा माफक शुल्कावर उपलब्ध करुन दिली जाईल. शासनाच्या क्रीडा विभागाद्वारे जिल्हा क्रीडा संकुले स्थापन करण्यात येत आहेत. या संकुलांमधे जागा उपलब्धतेनुसार अशी केंद्रे स्थापन करण्याबाबत तसेच संकुलातील वसतिगृहाचा काही भाग किमान दराने निवासी प्रयोजनार्थ देण्यासाठी विचार करण्यात येईल. स्पर्धा परिक्षा केंद्र शहरालगत असेल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय, | वित्त व नियोजन , रोजगार व स्वयंरोजगार, माहीती जनसंपर्क |
| | **तालुकास्तरीय माहिती केंद्र :-**<br>प्राथमिक स्तरावर तालुका क्रीडा संकुलामध्ये स्पर्धात्मक परीक्षेच्या अनुषंगाने ग्रंथालय तयार करणे, यामध्ये किमान राज्यस्तरावरील स्पर्धा परीक्षांना उपयुक्त नियतकालिके, वर्तमानपत्रे, पुस्तके तसेच रोजगार वार्तापत्रे उपलब्ध असतील. तसेच इंटरनेट सुविधा किमान दराने उपलब्ध करण्यात येतील. | | |
| ३. | **युवा पुरस्कार :-**<br>युवांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांचा गौरव करणे आवश्यक आहे. यातून युवक-युवतींना प्रेरणा मिळेल. जिल्हास्तरावर प्रत्येकी युवक / युवती २ व युवक संस्था १ यांना तसेच राज्यस्तरावर युवक / युवती ८ व संस्था ८ यांना प्रतिवर्षी हा पुरस्कार देण्यात | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | युवा कल्याणकारी कार्य करणा-या संस्था व व्यक्ती |

| अ.क्र. | योजनेचा तपशिल | अंमलबजावणी विभाग | सहाय्यक विभाग |
|---|---|---|---|
| | येईल. जिल्हा व राज्यस्तरीय वैयक्तिक पुरस्काराचे स्वरुप अनुक्रमे रोख रु. १०,०००/- व रु. ५०,०००/- तसेच सन्मानपत्र व मानचिन्ह अशा स्वरुपाचे असेल. जिल्हा व राज्यस्तरीय संस्थांना रोख पुरस्कार अनुक्रमे रू. ५०,०००/- व रू. १.०० लाख व सन्मानचिन्ह असे राहील. या पुरस्कारार्थीना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्यांप्रमाणेच सर्व सुविधा देण्यात येतील. प्रतिवर्षी राज्य युवा महोत्सवामध्ये हे पुरस्कार समारंभपूर्वक देण्यात येतील. | | |
| ४. | **युवा वसतिगृहाची स्थापना :-**<br><br>युवांना नोकरी, व्यवसाय, शिक्षण, मुलाखती, मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी वेळोवेळी शहरांमध्ये जावे लागते. अशावेळी त्यांना त्यांच्या निवासासाठी हक्काचे असे ठिकाण असणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी युवा वसतिगृहाची स्थापना करण्यात येईल. या वसतिगृहाचे दर हे वसतिगृहाचे व्यवस्थापन योग्य दर्जाने होण्याइतपत असेल. वसतिगृहामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील.<br>राज्यात दोन ठिकाणी आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय दर्जाचे वसतिगृह असेल. यामध्ये युवक आकर्षिले जातील अशा सोयी सुविधा असतील. विभाग-जिल्हास्तरावरील वसतिगृहांसाठी क्रीडा संकुलांमधील वसतिगृहाचा वापर करण्याबाबत विचार होईल. याच्या व्यवस्थापनासाठी मनुष्यबळ व पुरेसे अनुदान देण्यात येईल.<br>प्रथमतः सहा महसुली विभागात प्रत्येकी एक याप्रमाणे सहा वसतिगृहाची स्थापना करण्यात येईल. त्यानंतर पुढील टप्प्यात जिल्हास्तरावरील वसतिगृहाची निर्मिती करण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | महसुल विभाग, पर्यटन, सार्वजनिक बांधकाम विभाग,माहीती जनसंपर्क |
| ५. | **युवा महोत्सवाचे आयोजन :-**<br><br>सध्याच्या राज्य युवा महोत्सवासाठी देण्यात येणारे अनुदान अत्यल्प असल्याने प्रतिवर्षी रू. ५०.०० लाख इतका निधी देऊन भव्य आयोजन करण्यात येईल. युवा महोत्सव प्रक्रियेमध्ये विद्यापीठ यंत्रणांचा सहभाग अनिवार्य राहील तसेच राज्याचे सांस्कृतिक कार्य संचालनालय, नेहरु युवा केंद्र, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचा सहभाग असेल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | सांस्कृतिक कार्य संचालनालय, नेहरु युवा केंद्र, पर्यटन विभाग वित्त व नियोजन,विद्यापीठे |
| ६. | **युवा दिन व युवा सप्ताह व्यापक स्वरुपात साजरा करणे :-**<br>प्रचलित अनुदान मर्यादेत वाढ करण्यात येईल. युवा दिनाचे आयोजन प्रत्येक कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाला अनिवार्य असेल. याशिवाय तालुका व जिल्हा स्तरावर युवा सप्ताहाचा सर्वसमावेशक कार्यक्रम शासकीय यंत्रणेने स्थानिक सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा, संचालनालय | युवा कल्याणकारी कार्य करणा-या संस्था व व्यक्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |

| अ.क्र. | योजनेचा तपशिल | अंमलबजावणी विभाग | सहाय्यक विभाग |
|---|---|---|---|
| ७. | **युवा विकासाचे कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांना अर्थसहाय्य :-**<br>सध्याची समाजसेवा शिबीरे, शहरी व ग्रामीण भागातील युवक मंडळांना अर्थसहाय्य या योजनांचे एकत्रीकरण करण्यात येईल. नवीन योजनेचे निकष हे योजनेत सुलभता आणतानाच अंमलबजावणी वर प्रभावी नियंत्रण ठेवणारे असेल. या योजनेतील अर्थसहाय्याची मर्यादा रू. १.०० लाख इतकी करताना संस्था व राज्यशासन यांच्या हिश्याचे प्रमाण २५:७५ या प्रमाणात असेल. जिल्हयातील युवा लोकसंख्येच्या प्रमाणात योजनेसाठी वित्तीय तरतूद ठेवण्याची कार्यवाही जिल्हा नियोजन व विकास मंडळाद्वारे करण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | युवा कल्याणकारी कार्य करणाऱ्या संस्था |
| ८. | **युवा साहित्य संमेलनाचे आयोजन :-**<br>अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या धर्तीवर प्रतिवर्षी १८ ते ३५ वयोगटातील युवांसाठी युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येईल. यासाठी राज्यशासन प्रतिवर्षी अर्थसंकल्पात तरतूद करुन रू. २५.०० लाख इतके अनुदान उपलब्ध करुन दण्यात यईल. उर्वरित खर्च स्थानिक संयोजन समितीमार्फत करण्यात यावा. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | सांस्कृतिक कार्य संचालनालय, नेहरु युवा केंद्र, पर्यटन विभाग, वित्त व नियोजन, विद्यापीठे, युवा कल्याणकारी कार्य करणाऱ्या संस्था |
| ९. | **रोजगार उपलब्धता प्रसिध्दी :-**<br>जिल्हयातील विविध खाजगी व सहकारी उद्योग समूहातील त्या आर्थिक वर्षात रिक्त, उपलब्ध व निर्माण होणा-या पदांचा तपशील प्रतिवर्षी एप्रिल महिन्यात जिल्हा उद्योग केंद्राने एकत्रितरित्या संकलित करुन प्रसिध्द करावा. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय माहिती व जनसंपर्क संचालनालय. | रोजगार व स्वयंरोजगार विभाग |
| १०. | **तालुका व जिल्हा स्तरावर युवा-मित्रांची नियुक्ती :-**<br>तालुका स्तरावर रू.३,०००/- प्रतिमाह व जिल्हास्तरावर रू.५,०००/- प्रतिमाह या मानधनावर अंशकालीन पूर्णतः करार पध्दतीने '**युवा मित्र**' नियुक्त करण्यात येईल. जिल्हा स्तरावर प्रत्येकी एक युवक व युवती असे दोन वरिष्ठ युवा मित्र तसेच त्यांना सहकार्य करण्यासाठी दोन युवा मित्रांची (तालुकास्तरीय मानधन) नियुक्ती करण्यात येईल. याशिवाय तालुकास्तरावर युवा मित्राची नियुक्ती करण्यात येईल. त्यांनी स्थानिक युवक मंडळे व क्षेत्रीय क्रीडा विभाग यंत्रणा यांच्या सहकार्याने काम करावे. | क्रीडा व युवकसेवा संचालनालय | युवा कल्याणकारी कार्य करणा-या संस्था व मंडळे |
| ११. | **युवांना विविध विषयांची माहिती व त्यांचेकडील पात्रतेची नोंदणी स्वतःहून करता येईल यासाठी संकेत स्थळ निर्माण करणे :-**<br>महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. यांच्या सहकार्याने उद्योग विभाग संकेतस्थळ निर्माण करील. त्यावर राज्यातील | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि., रोजगार |

| अ.क्र. | योजनेचा तपशिल | अंमलबजावणी विभाग | सहाय्यक विभाग |
|---|---|---|---|
| | किमान कौशल्यप्राप्त युवा, तांत्रिक प्रशिक्षण प्राप्त युवा, उच्चतम तांत्रिक प्रशिक्षण प्राप्त युवा, सेवा उद्योगासाठी आवश्यक प्रशिक्षण प्राप्त युवा, व्यवस्थापन प्रशिक्षण प्राप्त युवा तसेच विविध शाखांतील पदवीधर युवा यांची वैयक्तिक माहिती संकलित ठेवण्यात येईल. या माहितीचे मासिक अद्ययावतीकरण केले जाईल. सर्व संबंधितांसाठी हे संकेतस्थळ खुले राहील. राज्यातील मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांना आपणाकडील संबंधित गटातील युवांनी अर्हता प्राप्त केल्यावर तात्काळ संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य केले जाईल. याबाबत आवश्यक सुविधा सदर संस्थांना दिली जाईल.<br>**युवा संकेतस्थळाची स्थापना करणे**- राज्यातील युवांना त्यांच्याशी निगडीत विविध विषयांवरील माहिती, उपक्रम, मार्गदर्शन इ.माहिती त्वरित मिळण्याच्यादृष्टीने स्वतंत्र संकेतस्थळाची स्थापना करण्यात येईल. | | व स्वयंरोजगार, शिक्षण संचालनालय |
| १२. | **दूरचित्रवाहिनीवर युवांसाठीच्या कार्यक्रमाचे व्यवस्थापन** :-<br>सध्या प्रसारित होत असलेल्या शासकीय व खाजगी टी. व्ही. चॅनेल्सवर युवकांकरिता समुपदेशन / मार्गदर्शन / प्रेरणा देऊ शकणारे कार्यक्रम दररोज किमान एक तास कार्यक्रम दाखविण्याची तरतूद करण्यात येईल. किमान सभ्यता, राज्यातील परंपरा व संस्कृती यांना छेद देणारे कार्यक्रम राज्यात प्रक्षेपीत होऊ नयेत यासाठी प्रचलित मनोरंजन विषयक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होईल. आवश्यकतेनुसार त्यामध्ये सुधारणा करणे तसेच केंद्रशासनामार्फत संबंधितांना निर्देश देण्याबाबतही आग्रही भूमिका शासन घेईल. याउपर भविष्यात राज्यशासन स्वतःची युवा वाहिनी सुरु करुन राज्यातील युवकांना व्यासपीठ उपलब्ध करुन देईल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | सांस्कृतिक संचालनालय, सहयाद्री दूरदर्शन |
| १३. | **राज्यांतर्गत युवा आदान-प्रदान कार्यक्रम** :-<br>राज्याची भौगोलिक, सांस्कृतिक विविधता लक्षात घेता एका प्रादेशिक विभागातील युवांचे दुस-या प्रादेशिक विभागात आदान- प्रदान करण्यात यावे. यासाठी जिल्हा नियोजनात तरतूद करण्यात येईल. यामध्ये जिल्हयातील २० युवक/युवती यांचा समूह दुस-या प्रादेशिक विभागात दहा दिवस वास्तव्य करेल. निवास/भोजन यांचा खर्च स्थानिक स्वराज्य संस्था, युवक मंडळे, प्रतिष्ठीत व्यक्ती, औद्योगिक प्रतिष्ठाने यांचे सहकार्याने करण्यात येईल. या कालावधीत सदर प्रादेशिक विभागातील विकासाच्या प्रेरणा, स्थानिक भाषा/ खाद्य संस्कृती/राहणीमान/पारंपारिक रितीरिवाज यांचा मागोवा घेतला जाईल. या उपक्रमाचे स्वरुप केवळ पर्यटन न राहता अभ्यासपूर्ण पर्यटन असे असेल. यासाठी प्रायोगिक तत्वावर प्रत्येक जिल्ह्यास किमान रू. १.०० लाख इतकी तरतूद करण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | सांस्कृतिक संचालनालय, सहयाद्री दूरदर्शन नेहरु युवा केंद्र, पर्यटन विभाग वित्त व नियोजन, विद्यापीठे ,युवा कल्याणकारी कार्य करणा-या संस्था |

| अ.क्र. | योजनेचा तपशिल | अंमलबजावणी विभाग | सहाय्यक विभाग |
|---|---|---|---|
| १४. | **राष्ट्रीय युवा आदान-प्रदान कार्यक्रम :-** देशाची भौगोलिक, सांस्कृतिक विविधता लक्षात घेता राज्यातील युवांचे दुस-या राज्यात आदान- प्रदान करण्यात यावे. यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात येईल. यामध्ये प्रत्येक विभागातील ५० युवक/युवती यांचा समूह दुसऱ्या राज्यात दहा दिवस वास्तव्य करेल. निवास/भोजन यांचा खर्च स्थानिक स्वराज्य संस्था, युवक मंडळे, प्रतिष्ठीत व्यक्ती, औद्योगिक प्रतिष्ठाने यांचे सहकार्याने करण्यात येईल. या कालावधीत सदर राज्यातील विकासाच्या प्रेरणा, स्थानिक भाषा/ खाद्य संस्कृती / राहणीमान / पारंपारिक रितीरिवाज यांचा मागोवा घेतला जाईल. या उपक्रमाचे स्वरुप केवळ पर्यटन न राहता अभ्यासपूर्ण पर्यटन असे असेल. यासाठी प्रायोगिक तत्वावर प्रत्येक विभागास किमान रू. ३.०० लाख इतकी तरतूद करण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा, संचालनालय | सांस्कृतिक संचालनालय, नेहरु युवा केंद्र,पर्यटन विभाग ,वित्त व नियोजन, विद्यापीठे ,युवा कल्याणकारी कार्य करणा-या संस्था |
| १५. | **जीवन कौशल्य शिक्षण** - शैक्षणिक अभ्यासक्रम हे वैज्ञानिक दृष्टीकोन, अनुभवाधारित आकलन, पर्यावरणाबावत जागरुकता, व्यावसायिक शिक्षणावर भर आणि स्वदेशी, पारंपारिक ज्ञान संपदेचा आदर यांना प्रोत्साहन देणारे असेल. जीवन कौशल्य शिक्षणाचा अंतर्भाव शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात करण्यात येईल. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, | पर्यावरण विभाग, तंत्रशिक्षण संचालनालय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १६. | **व्यवसाय शिक्षण कायदा** - केंद्रशासनाने सन २००९ मध्ये शिक्षणाच्या हक्काचा कायदा अंमलात आणलेला आहे, त्याच धर्तीवर व्यवसाय शिक्षण कायदा अंमलात आणण्यात येईल. | तंत्रशिक्षण संचालनालय | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,,उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १७. | **सुविधा केंद्र उभारणी-** महानगरपालिका, नगरपालिका परिक्षेत्रातील वाढते नागरिकरण लक्षात घेता युवांकडे असणाऱ्या तांत्रिक कौशल्यांचा सुयोग्य वापर स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी असेल. यासाठी महानगरपालिका, नगरपालिका यांनी युवा सेवा केंद्र उभारावीत, युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांमार्फत या केंद्रांतर्गत नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत (उदा.वीज बील भरणे, वीज, फॅन, इलेक्ट्रीक/ इलेक्ट्रॉनिक वस्तूंची दुरुस्ती, गवंडीकाम, नळ, टाकी, हौद दुरुस्तीची कामे, रेल्वे/एस.टी.ऑनलाईन तिकिटांचे आरक्षण इ.) सेवा पुरविण्यात येतील. युवा विकास केंद्रांमध्ये सेवा करु इच्छिणाऱ्या युवांची नोंदणी करण्यात येईल. शासन सुविधा केंद्र उभारण्यासाठी पुढाकार घेईल. | **महानगरपालिका, नगरपालिका,** नगर विकास विभाग | तंत्रशिक्षण संचालनालय, रोजगार व स्वयंरोजगार शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था |

| अ.क्र. | योजनेचा तपशिल | अंमलबजावणी विभाग | सहाय्यक विभाग |
|---|---|---|---|
| १८. | **युवा नेतृत्व व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण व इतर युवक कल्याणकारी कार्यक्रम –**<br>युवांमध्ये असणाऱ्या नेतृत्वगुणांना चालना देण्यासाठी तसेच त्यांच्यातील व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल तसेच युवा कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येईल. शासन व संस्था यांचा हिस्सा ७५:२५ असेल. रु.२५,०००/- ते रु.३,००,०००/- या मर्यादेत लघु व दीर्घ कालावधीच्या उपक्रमांसाठी संस्थांना अनुदान देण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | वित्त व नियोजन विभाग, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, युवा कल्याणकारी कार्य करणाऱ्या संस्था, |
| १९. | **युवा सामाजिक प्रतिष्ठा निर्देशांक (सोशल क्रेडिट)** - सामाजिक कार्याला प्रतिष्ठा देऊन युवकांमधील उर्जेचा वापर राष्ट्र उभारणीसाठी करणे शक्य असल्याने युवांनी केलेल्या समाज हिताच्या कार्याचे मूल्यमापन होण्याकरीता मानके निश्चित करण्यासाठी तज्ज्ञांची त्रिस्तरीय समिती नियुक्त करण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय | सर्व प्रशसकीय विभाग, विद्यापीठे, युवक संस्था, समाज हिताचे कार्यकरणारे युवा |
| २०. | **कौशल्य विकास संस्था स्थापन करणे** – युवांकडे असलेल्या विविध कौशल्यांमध्ये पारंगतता आणून जागतिकीकरण स्पर्धेमध्ये त्यांनी कालसुसंगत राहणे तसेच नवीन कौशल्यांचा विकास करण्याकरीता महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था राज्यात स्थापन करण्यात येईल. | क्रीडा व युवक सेवा संचालनालय<br><br>उच्च तंत्र शिक्षण विभाग | तंत्रशिक्षण संचालनालय विद्यापीठे, युवक संस्था, समाज हिताचे कार्यकरणारे युवा |